रवाना ता०

सर्क्युलर नंबर

विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, पुणें सार्वजनिक सभेच्या व्यवस्थापक मंडळीची सभा खालील गोष्टींचा विचार करण्याकरितां सार्वजनिकसभेच्या जागीं जोशीहॉलांत तारीख ९ माहे [illegible] सन १८९६ इसवी [illegible] रोजीं सायंकाळीं मद्रास [illegible]. वाजतां भरणार आहे. तरी आपण सदर्हू वेळीं कृपा करून अगत्य येण्याची मेहेरबानी करावी. कळावें, ही विनंति.

१. तारीख माहे सन १८९ रोजीं भरलेल्या म्यानेजिंग कमिटीचें प्रोसिडिंग वाचून दाखविणें.

२. [illegible]

३. [illegible]

४ [illegible]

G. K. Paranjape.

[illegible]

पुणें, ता० ११ नोवेंबर १८९६.

वि० वि०. सांप्रतच्या स्थितीवरून यंदां दुष्काळ पडून व शेंकडों गरीब लोक अन्नास महाग होऊन त्यांचीं मुलें उघडीं पडणार, असा संभव दिसूं लागला आहे. अशा निराश्रित मुलांकरितां वेळींच कांहीं तजवीज न केली तर कित्येक आपल्या देखत मरण पावतील किंवा ज्यांचे हातीं तीं पडूं नयेत अशी आपली इच्छा आहे त्यांचे हातीं पडतील. अशी स्थिति न यावी म्हणून अनाथ मुलांस थारा मिळून त्यांचें संगोपन व्हावें अशी येथील कांहीं गृहस्थांची इच्छा आहे. म्हणून ह्या गोष्टीचा विचार करण्याकरितां दाणेआळींतील जोशीहालांत रविवार तारिख १५ नोवेंबर सन १८९६ इसवी रोजीं सायंकाळीं मद्रास ५ वाजतां येथील प्रमुख गृहस्थांची सभा भरविण्याचें योजिलें आहे; तरी सदर ठिकाणीं सदर वेळीं आपण सभेस येण्याची अवश्य कृपा करावी. कळावें, ही विनंती.

रामकृष्ण गोपाळ भांडारकर.
काजी शहाबुद्दीन.
दादाभाई बुटी.
बाळ गंगाधर टिळक.
बापू पुरुषोत्तम जोशी.
बाळकृष्ण रामचंद्र वैद्य.
वासुदेव बापूजी कानिटकर.
श्रीराम भिकाजी जटार.
विश्राम रामजी घोले.
रामनारायण.
परशराम खूपचंद.

ज्ञा० प्र० छा०, पुणें.

SARVAJANIK SABHA OFFICE
POONA
No. ५८

SARVAJANIK SABHA OFFICE
POONA
No. ७६

V. R. Patavardhan
Secy.

NO. 608 of 1897.

SARVAJANIK SABHA ROOMS,
Poona, 6th July, 1897.

To

R. A. LAMB, ESQUIRE, I. C. S.,
Collector, Poona.

Sir,

I have been directed by the Managing Committee of the Sarvajanik Sabha, Poona, to forward to you the accompanying resolutions passed at a meeting of the Committee held on 5th July 1897, and to request that you will be good enough to communicate the same to the Government. I beg also to request that you will kindly convey to the relations of the late Lieutenant Ayerst, and Mr. Rand I. C. S. the deep sympathy of the Sabha in the sad bereavement caused by the shocking event of the night of the 22nd June last.


I have the honor to be
Sir,
Your most obedient servant
V. R. PATAVARDHAN,
Chairman, Managing Committee,
Sarvajanik Sabha, Poona.

Resolutions—Passe

1. The Sabha records its deep
of sorrow for the murderous a
assassins, on Lieutenant Ayers
Chairman of the Poona Plagu
night of the 22nd June, and the s
two officers resulting therefrom w
gloom over the whole city, and al
ence for the dastardly and heinou

2. The Sabha earnestly desi
the authors of the terrible crimes
and brought to justice, and feels
co-operate with the authorities,
power, to detect the crime, and
punished according to law.

3. The Sabha thinks that unt
no political character can be ascri
and mournful events for the crimes n
festations only of private reveng
fanaticism.



उत्तरा पानेतं अधोरेखित केलेले प्रेरक टिकाटिपणी पाठविले आहे - कळावे.

॥ श्री ॥ ता. २२-१-८७

रा. रा. सिताराम महादेव पराजंपे व अच्युत सिताराम साठे सेक्रेटरी सार्वजनिक सभा पुणे.

यांस वक्तृत्वमंडळ सभेचे सेक्रेटरी येवले जि. नाशिक याजकडून कळविण्यांत येतें कीं, आपणां पैकीं श्री. पराजंपे कांहीं दिवसां पूर्वी येथें आले होते त्या वेळेस त्यांनीं येथील "पब्लिक जनरल रीडिंगरूम" ची स्थिति पाहिली. त्याच रूम मध्यें ही शारदा काढली आहे ही शारदा काढण्यास श्री. पराजंपेच कारण आहे. तेंच कारण मूल कसे म्हणाल तर ते त्या वेळेस येथें आले होते त्या वेळेस त्यांनीं जे जाहीर व्याख्यान दिलें तें व्याख्यान विशेष कळकळीचें, जोरदार आणि निस्पृहतेचें असे ऐकून येथें वरील नांवाची शारदा काढण्याची आवश्यकता वाटल्या वरून ही शारदा काढली आहे. आतां या शारदेंत आपण कडून जी माहिती मिळण्याची अवश्यकता आहे ती खालीं दर्शविल्या प्रमाणें :—

वक्तृत्व कलेची अंगे माहिती होण्यास कोण कोणत्या पुस्तकांची आवश्यकता आहे त्यांची माहिती लांबे कळवावी.

सोमवार, वैशाख शुद्ध १४ शके १८०१.

लवाद कोर्टाचे संबंधानें येथील लोकांची जाहिर सभा.

A PUBLIC MEETING IN CONNECTION WITH THE LAWAD COURTS.

मुंबई इलाख्यापैकीं पुणें, सातारा, सोलापूर आणि अहमदनगर या चार जिल्ह्यांतील कर्जबाजारी शेतकरी लोकांस मदत देण्याच्या हेतूनें एक कायदा तयार करण्याचें काम आनरेबल मि० होप यांजकडे हल्लीं सरकारानें सोंपविलें असल्यामुळें त्यांस ह्या विषयाचे संबंधानें योग्य प्रकारच्या सूचना करण्यास्तव व आपले लोकांत पंचाइतीचा प्रकार सुरू करण्याविषयीं विचार करण्यास्तव आम्हीं मागील अंकांत लिहिल्याप्रमाणें येथील लोकांची जाहिरसभा काल रोजीं दोन प्रहरीं चार वाजतां हिरा बागेंतील इमारतींत भरली होती. ह्या प्रसंगीं शहरांतील शेट सावकार व सभ्य गृहस्थ व सरकारी नौकर पुष्कळ आले होते. ह्या सभेचे संबंधानें विशेष गोष्ट अशी होती कीं, पुणें, अहमदनगर, सोलापूर आणि सातारा या चार जिल्ह्यांतील रयतेच्या संबंधानें विचार करणें असून तीन जिल्ह्याचे डिस्त्रिक्ट जज्ज सभेस आले होते. म्हणजे पुणें जिल्ह्याचे डिस्त्रिक्ट जज्ज मेहेरबान न्यूनहाम साहेब, अहमदनगर जिल्ह्याचे डिस्त्रिक्ट जज्ज मेहेरबान वेडरबर्न साहेब, व सोलापूर जिल्ह्याचे डिस्त्रिक्ट जज्ज मेहेरबान पोलन साहेब हे सभास्थानीं हजर होते. सभा भरविण्याची जाहिरात प्रथमतः वाचून दाखविल्यानंतर मेहेरबान न्यूनहाम साहेब येथील डिस्त्रिक्ट जज्ज ह्यानीं सभेचे अध्यक्षस्थानीं बसावें अशी सूचना श्री० रा० रा० बाबा साहेब सांगलीकर ह्यानीं केली व तीस श्री० रा० रा० महादेवराव यशवंत रास्ते ह्यानीं अनुमोदन दिलें. साहेब बहादुरानीं थोडकें भाषण केलें, व ठाणें जिल्ह्याचे जज्ज मे० कागलन साहेब ह्यांजकडून आलेलें पत्र वाचून दाखविलें, व तदनंतर सभेचे कामास सुरुवात झाली. प्रथमतः मि० गणेश वासुदेव जोशी यांणीं अशी सूचना केली कीं, आपले लोकांत पंचाइतीचा प्रकार सुरू करून त्यास उत्तेजन देण्यांत आल्यास व तो प्रकार दिवसेंदिवस वाढत गेल्यास देशांतील शेतकरी लोकांच्या स्थितींत विशेष सुधारणा होणार आहे. ह्या सूचनेस अनुरूप असें मि० जोशी यांचें संभाषण आटोपल्यानंतर मि० दिनकर बल्लाळ चक्रदेव सोलापूर जिल्ह्यांतील वकील व सदर्हू ठिकाणच्या लवाद कोर्टाचे प्रतिनिधी यांणीं सुरस संभाषण करून मि० जोशी यांच्या सूचनेस आपलें अनुमोदन दिलें. पुढें मेहेरबान वेडरबर्न साहेब यांणीं अशी सूचना केली कीं, सावकार व शेतकरी लोक या उभयतांतील तंट्याच्या संबंधानें अपअपसांत मिटवामिटव होणें ही पहिली इष्ट गोष्ट होय, व ही गोष्ट न साधल्यास सदर्हू तंटयाचा निकाल पंचांचे मार्फत व्हावा ही दुसरी गोष्ट होय, व पक्षकार यांचा पंचांचे संबंधानें एक विचार न झाल्यास अखेरीस सदर्हू तंटयाचा निकाल दिवाणी कोर्टाचे मार्फत व्हावा ही तिसरी गोष्ट होय. ह्या सूचनेच्या संबंधानें मेहेरबान वेडरबर्न साहेब यांणीं फारच सुरस असें संभाषण केलें. ह्या संभाषणांतील तात्पर्य येणेंप्रमाणें:—लवाद कोर्टाचे बाबतींत पुणें शहरच्या लोकांनीं मोठें यश मिळविलें असल्यामुळें अपसांत तंटे मिटवून शांतता कायम राखल्यानें जे फायदे होतात त्यांचें विशेष विवेचन करण्याची जरूर आहे असें आह्मास वाटत नाहीं आपले दरिद्री देशबांधव दिवाणी कोर्टाचे कचाटींत न सांपडावे, व त्यांचा पैसा खर्च न व्हावा म्हणून आपलें स्वतःचें नुकसान करून झटणारे असे या शहरांतील पुष्कळ गृहस्थ येथें हजर आहेत. ह्या लोकांस लवाद कोर्टांतील मूल बीज हरएक रीतीनें पसंत आहे हें उघडच आहे. दक्षणेंतील शेतकरी लोकांच्या दारिद्र्यावस्थेची सरकारास पूर्ण माहिती असून त्यानीं ह्या शेतकरी लोकांस मदत करण्याच्या इराद्यानें विशेष कायदे सुरू करण्याचा निश्चय केला आहे. पुष्कळ विचारांतीं सरकारचा असा अभिप्राय झाला आहे कीं, शेतकरी लोकांस मदत देण्याचे कामांत आपसांत तंटे मिटविण्याचा प्रकार विशेष रीतीनें अमलांत आणला पाहिजे. हिंदुस्थानांतील शेतकरी लोक व फ्रान्स देशांतील शेतकरी लोक यांची स्थिति पुष्कळ अंशानें एकसारखी आहे. ह्या विषयाचे संबंधानें स्टेट सेक्रेटरी साहेब यानीं नुकताच जो खलिता लिहिला आहे त्यांतील आशय असा आहे कीं, फ्रान्स देशांतील लवाद कोर्टांप्रमाणें हिंदुस्थानांत योग्य फेरफार करून लवाद कोर्टें सुरू केल्यास रयतेचा विशेष फायदा होणार आहे. फ्रान्स देशांतील लवाद कोर्टांच्या संबंधानें सर फ्रेडेरिक गोल्डस्मिड यानींही अनुकूळ असा अभिप्राय दिला आहे. फ्रान्स देशांतील लवाद कोर्टाची व्यवस्था हिंदुस्थान देशांत उत्तम रीतीनें सुरू करितां येईल असें आह्मास वाटतें, व गांवोगांव पंचाइती स्थापन केल्यानें अापसांत तंटे मिटले जाऊन सावकार व शेतकरी लोक या उभयतांतील कलह नाहींसा होणार आहे. हिंदुस्थान देशांत पंचाइतीचा प्रकार सुरू केल्यानें सरकारचें वर्तन सुशिक्षित नेटिव लोकांत पसंत होणार आहे येवढेंच नव्हे, परंतु हें वर्तन मामूल वहिवाटीस अनुसरून असल्यामुळें साधारण रयतेसही विलक्षण प्रिय होणार आहे. ह्या विषयाचे संबंधानें सरकारचा हल्लींचा हुकूम होण्याचे पूर्वीच आनरेबल मि० होप यांजपाशीं आमचा पत्रव्यवहार सुरू होता व हल्लीं मि० गणेश वासुदेव जोशी यांच्या साह्यानें व मुंबई आणि मद्रास इलाख्यांतील जुन्या रेग्युलेशन्सच्या आधारानें आम्हीं पंचाइतीच्या संबंधानें एका कायद्याचा खर्डा तयार केला आहे. सावकार व शेतकरी लोक यांचे दरम्यानच्या तंट्याच्या संबंधानें आम्हीं वर ज्या तीन गोष्टी सांगितल्या आहेत त्यांपैकीं प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें पंचांचा उपयोग होणार आहे. सावकार व शेतकरी लोक यांचे तंटे अपअपसांत मिटले जावे ह्मणोन दोन्ही पक्षकारांस पंचाकडून सल्ला मिळत जाईल व त्यांच्या इच्छतीनें हें काम शेवटास जाणार आहे. हे तंटे अपसांत न मिटल्यास निकालास्तव लवादांकडे जावे ही दुसरी गोष्ट होय, व हे लवाद सदर्हू पंचांतूनच निवडले जाणार आहेत. अखेरीस हे तंटे दिवाणी कोर्टांत गेले तर ह्याच पंचांनीं असेसरचें काम करून न्यायाधिशास आपले माहितीचा फायदा दिला पाहिजे. आम्हीं सांप्रत जो खर्डा तयार केला आहे त्यांत विचाराअंतीं पुष्कळ सुधारणा होण्याजोगी आहे व पंचाइतीचा प्रकार सुरळीत रीतीनें चालणें जरूर असल्यामुळें सुशिक्षित नेटिव लोकांचा व त्याचप्रमाणें साधारण रयतेचा अभिप्राय ह्या संबंधानें स्पष्ट रीतीनें समजून घेणें अगत्याचें आहे. हा खर्डा तयार करीत असतां आम्हास एक दोन नवीन कल्पना सुचल्या आहेत. सावकारांची अर्जी प्रथमतः पाटलाजवळ जावी. पाटील व कुळकर्णी यांणीं उभयतां सदर्हू अर्जीतील प्रकार पंचाइतीपुढें ठेवावा आणि आपल्या इच्छतीनें तंटा अपसांत मिटल्यास तो तशा रीतीनें मिटण्याचा प्रयत्न

करावा. म्हणजे वर लिहिलेल्या तीन गोष्टींपैकीं पहिल्या गोष्टीस विशेष उत्तेजन मिळणार आहे. लहान सहान गुन्ह्याच्या संबंधानें निकाल करण्याचा अधिकार पंचांस असावा ही दुसरी सूचना होय. फ्रान्स देशांतील लवाद कोर्टांस पांच दिवस कैद व १० रुपये दंड अशी शिक्षा देण्याचा अधिकार आहे व अशाच प्रकारचा अधिकार गांवोगांवच्या पंचांस दिल्यास चांगलें होणार आहे. सिलोन बेटांत दिवाणी व फौजदारी कामाच्या संबंधानें पंचाइतीचा प्रकार फारच उत्तम रीतीनें चालत असून सदर्हू संबंधानें ग्लोब नांवाच्या वर्तमानपत्रांत जी माहिती प्रसिद्ध झाली आहे ती आम्ही सभेस वाचून दाखवितों.

मेहेरबान वेडरबर्न साहेब यांचे वर लिहिलेल्या आशयाचें सुरस संभाषण पुरें झाल्यानंतर साहेब महमुद यांच्या सूचनेस मि० शिताराम हरी चिपळुणकर यानीं आपलें अनुमोदन दिलें. मि० चिपळुणकर यांचे संभाषणांतील आशय असा होता कीं, अपअपसांत तंटे मिटवून शांतता कायम राखणें ही गोष्ट इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांतील मोठमोठाल्या अधिकाऱ्यांस अनुमत असल्यामुळें तत्संबंधानें विशेष रीतीनें बोलण्याची जरूरी नाहीं. ज्या इंग्रज सरकारच्या दयाळू अमलाखालीं आपण सुधारणेच्या सुखाचा अनुभव घेत आहों त्याच इंग्रज सरकारानें हा वर्तनक्रम अमलांत आणला आहे. राजकीय कारभारांत बळी तो कान पिळी हा प्रकार नेहेमीं सुरू असतां इंग्रज सरकारानें आपण व अमेरिकन सरकार या उभयतांतील तंटा लवादाकडे सोपवून निर्णय करविला, व अशा रीतीनें शांतता कायम राखली. एशियाखंडांतील राष्ट्रांचे दरम्यानचे तंटे तोडण्याचे कामांत इंग्रज सरकारानें हाच वर्तनक्रम सुरू केला आहे ही गोष्ट सर्वांस माहितच आहे. राजकीय संबंधाचे बाबतींत जर लवादांपासून अशा रीतीचा फायदा होतो तर स्वतेच्या बाबतींत ह्याहूनही अधिक फायदा निश्चयानें होणार आहे हें उघड होय. लवाद कोर्टांपासून होणाऱ्या सोयीच्या संबंधानें सर फ्रेडरिक गोल्डस्मिड यानीं अति उत्तम प्रकारचा रिपोर्ट केला असल्यामुळें तत्संबंधानें विशेष बोलण्याचें कांहींएक प्रयोजन नाहीं. आपले माजी गवरनर सर फिलिप वुडहाउस यानीं जातें वेळीं आपल्यास असा उपदेश केला आहे कीं, आपल्यास ज्या गोष्टी पाहिजे असतील त्या मिळे तोंपर्यंत तत्संबंधानें गवगवा करण्याचें काम कधींही थांबूं नये व असें केलें म्हणजे सदर्हू गोष्टी निश्चयानें आपल्यास मिळतात. नेक नामदार सर फिलिप वुडहाउस यांचा हा विचार लक्षांत बागविणें फारच इष्ट आहे. हल्लीं लवाद कोर्टाचें संबंधानें कांहीं गोष्टी आपल्यास देण्याचें सरकारानें कबूल केलें आहे व अशा प्रकारच्या सर्व गोष्टी आपल्यास पूर्ण रीतीनें मिळत तोंपर्यंत आपण स्वस्थ बसूं नये, मि० चिपळुणकर यांचें वर लिहिलेल्या मतलबाचें संभाषण झाल्या नंतर मि० बाबाजी कृष्ण गोखले यानीं अशी सूचना केली कीं, सभेंत आतांच सर्वानुमतें ज्या दोन सूचना पसंत झाल्या त्यांस अनुसरून तयार केलेला हा कायद्याचा खर्डा साधारण रीतीनें सभेनें पसंत करावा व ह्या खर्ड्याचा विचार करून योग्य प्रकारच्या सुधारणा करण्यास्तव व आनरेबल मि० होप यांजकडे अखेरचा रिपोर्ट पाठविण्यास्तव एक सब् कमिटी नेमण्यांत यावी. ह्या सूचनेस रा० केवळभाई ह्यानीं अनुमोदन दिलें. ही सूचना सर्वानुमतें मान्य झाल्यानंतर रा० ब० चिंतामण राव हरी देशमुख यानीं खालीं लिहिलेल्या गृहस्थांची सब् कमिटींत योजना व्हावी अशी सूचना केली व तीस रा० ब० श्रीनिवास सेषो ह्यानीं अनुमोदन दिलें. हीं नांवें येणेंप्रमाणें:-

१ राव बहादूर श्रीनिवासराव शेषो.
१ ,, सदाशिवराव बल्लाळ गोंड्ये.
१ ,, चिंतामणराव हरी देशमुख.
१ ,, कृष्णाजी विष्णु लिमये.
१ ,, माधवराव गोविंद रानडे.
१ ,, विष्णु मोरेश्वर भिडे.
१ ,, चिंतामण सखाराम चिटणीस.
१ रावसाहेब अमृत श्रीपत नागपुरकर.
१ ,, गणपत अमृत मानकर.
१ खानसाहेब नवरोजी दोराबजी खंडाळेवाल
१ रा. रा. गंगाधर गोविंद गोखले सावकार
१ ,, ,, गोविंद महादेव गद्रे सावकार.
१ ,, ,, दिनकर बल्लाळ चक्रदेव.
१ रा० केवळभाई.
१ ,, ,, गणेश वासुदेव जोशी.
१ रा० सा० कृष्णराव सदाशिव जोगळेकर सबार्डिनेट जज्ज.
१ रा. रा. शिताराम हरी चिपळुणकर सेक्रेटरी.

अखेरीस राव बहादूर सदाशिव बल्लाळ गोंडे यांणीं अध्यक्ष मेहेरबान न्यूनहाम साहेब, मेहेरबान वेडरबर्न साहेब व मे० पोलन साहेब यांचे सर्व सभासदांच्या वतीनें मोठे आभार मानिले आणि अशा रीतीनें ही जाहिर सभा विसर्जन झाली. सभेंत वर लिहिलेल्या सूचनांचा विचार होत असतां रावसाहेब काशिनाथ बाळकृष्ण मराठे व रावसाहेब कृष्णाजी विष्णु लिमये वगैरे गृहस्थांनीं संभाषणें केलीं. राव बहादूर लिमये यांचें संभाषण फारच अप्रयोजक असोन त्यांचे सर्टिफिकिटाचे संबंधानें सर्व सभासदांस कांहीं वेळ मोठी मौज वाटली. राव बहादुरांचे अप्रयोजक व अप्रासंगिक संभाषणाच्या संबंधानें आम्हास विशेष लिहिणें आहे, परंतु तसें आज स्थल संकोच्यामुळें करवत नाहीं. रावसाहेब मराठे यांचें संभाषण चांगले विचाराचें होतें, परंतु तें विषयांतील किरकोळ गोष्टीस अनुलक्षून असल्यामुळें त्याचा सब् कमिटींत योग्य रीतीनें विचार होईलच, सबब तत्संबंधानें येथें विशेष लिहिण्याची जरूर नाहीं. ह्या जाहिर सभेंत ज्या ज्या सूचनेंचा विचार झाला त्या त्या अखेरीस सर्वानुमतें पसंत ठरल्या, परंतु ह्या गोष्टीस एक अपवाद होता तो असा कीं, पंचाइतीचा प्रकार आपले देशांत सुरू झाला असतां शेतकरी लोकांचें हित होणार आहे ही गोष्ट राव साहेब दिनकर धोंडदेव दातार यांस पसंत झाली नाहीं. रा० सा० दातार हे सर्व सभेंत एकटेच निराळ्या अभिप्रायाचे होते सबब त्यांच्या अभिप्रायास कोणत्याही प्रकारचें महत्व देतां येत नाहीं हें तर उघडच आहे, परंतु रा० साहेब दातार यांचा असा अभिप्राय होण्यास कोणतें विशेष कारण होतें हें आम्हास समजत नाहीं. लवाद कोर्टाचे संबंधानें विशेष माहिती मिळवून रा० सा० दातार यांनीं मोठा गहन विचार केला असेल तर कोण जाणें. असतु, एकंदरीनें सभेचें काम चांगल्या रीतीनें शेवटास गेलें.

पुणें, ज्ञानप्रकाश, तारीख ५ मे १८७९.

नेक नामदार गवरनर साहेब यांस मानपत्र देण्यास्तव गेलेलें डेप्युटेशन.

DEPUTATION TO THE GOVERNOR.

येथील सार्वजनिक सभेचे मार्फत एक डेप्युटेशन नेक नामदार सर रिचर्ड टेंपल साहेब यांजकडे गेल्या शुक्रवारीं दोन प्रहरीं गेलें होतें. डेप्युटेशनांत जे गृहस्थ होते त्यांचीं नांवें येणेप्रमाणें:—मि० शिताराम हरी चिपळोणकर, राव बहादूर श्रीनिवास शेषो, राव बहादूर चिंतामणराव हरी देशमुख, मि० चिंतामणराव विश्वनाथ ऊर्फ भाऊ साहेब नातु, मि० महादेव यशवंत ऊर्फ तात्या साहेब रास्ते, मि० गणेश वासुदेव जोशी, मि० सखाराम रामचंद्र जोशी, मि० गजाननराव सदाशिव पटवर्धन, मि० नागेश्वरगीर कल्याणगीर बोवा गोसांवी, मि० रामशास्त्री आपटे, मि० विठोबा खंडाप्पा गुळवे, आणि मि० शिवराम हरी साठे. प्रथमतः मि० चिपळोणकर यांणीं डेप्युटेशनांतील गृहस्थांची व नेक नामदार साहेबांची मुलाखत करून दिली. नंतर मि० चिपळोणकर यांणीं असें बोलून दाखविलें कीं, गेल्या बारा महिन्यांत राजकीय संबंधानें अनेक महत्वाच्या गोष्टी झाल्या असतांही नेक नामदार साहेबांनीं मोठ्या चातुर्यानें राज्यकारभार चालविला व रयतेस हितकारक अशा अनेक गोष्टी केल्या. मि० चिपळोणकर यांणीं आणखी कांहीं गोष्टींचा उल्लेख करून अखेरीस असें सांगितलें कीं, नेक नामदार साहेबांच्या राज्यकारभारापासून सर्वांस मोठा संतोष झाला आहे, व हा संतोष प्रदर्शित करण्याकरितांच सभेकडून सांप्रतचें डेप्युटेशन आलें आहे. नंतर मि० चिपळोणकर यांणीं मानपत्र वाचलें. हें मानपत्र फारच मोठें आहे सबब त्याचें अक्षरशः भाषांतर केलें असतां विशेष जागा अडणार आहे. ह्या मानपत्रांतील तात्पर्य येणेप्रमाणें:—

मागील सालीं मुंबई इलाख्यांत अनेक भयंकर गोष्टी घडल्या. अतिशृष्टि, टोळधाड व उंदीर वगैरे कारणानें रयतेस दुष्काळासारखा त्रास सोसावा लागला. मुंबई येथें अनेक व्यापाऱ्यांनीं दिवाळीं काढलीं, व सरहद्दीवर लढाई सुरू झाली. धारणीचें मान वाढल्यामुळें रामोशी वगैरे लोकांनीं लुटालूट सुरू केली. अशा स्थितींत नेक नामदार साहेबांच्या धूर्तपणावर व इतर गुणावर रयतेचा पूर्ण विश्वास होता. चालू सालचे प्रारंभीं नेक नामदार साहेबांची स्वारी गुजराथ व काठेवाड प्रांतांत फिरावयास गेली. नेक नामदार साहेबांच्या ह्या वर्तनापासून सर्व प्रजेस मोठा फायदा होत आहे. काठेवाड प्रांतांतील सफर संपल्यानंतर नेक नामदार साहेब सिंध प्रांताचे सरहद्दीवर गेले, व लढाईचे संबंधानें कामिसरीयट वगैरे खात्यांत जो घोटाळा झाला होता तो नेक नामदार साहेबांनीं दूर केला. सिंध प्रांतांतील काम संपल्यानंतर नेक नामदार साहेब कारवार व दक्षिण महाराष्ट्र देश पहावयास गेले, व ह्या प्रांतांत विलक्षण उष्णता असतांही नेक नामदार साहेबांनीं

No 1510 of 1846

S. S. Rooms,
Poona 9th Sept 1846

From S. M. Paraspye Esq
Hon Secy S. I. Pa

To Prof S. K. Sathale
Ferguson College
Pa

Sir,

In pursuance of a Resolution of the
G. C. I have been desired by the ~~Secretary~~
Chairman of the Managing Committee to com-
-municate to you on behalf of the Sabha
its expression of sincere thanks for
your valuable services both as an
Hon. Secy and Editor of the Sabha's
Quarterly Journal for the above
years last.

I have the honor to be
Sir,
Your most obedt Servt
S. M. Paraspye
Hon Secy S. I. Pa

॥ श्री ॥ पुणे: आनंदाश्रम
ता० १०-१०-६८

स. न. वि. वि. इ.स. १८८२ किंवा ९
साली कुष्ठाच्या संबंधाने श्री वी वाडून
दक्षिण हिंदुस्थानांतील कित्येक ठिकाणच्या
कुष्ठासंबंधी माहिती मिळवीण्यासाठी
सर्वत्र दौरे करीत असतां कारवार
गावचा मला भाडा आलां तेथेंही
पाहिजे आहे. तो शोधून काढून मी
विद्यार्थी तसदी घेतल्याबद्दल मजवर
फार उपकार होतील

श्रीधरपंत पिंपळे

ज्याशीं तिळमात्र संबंध नव्हता.

देशांतील शेतकरी लोकांचे संबंधानें हल्लीं जे कायदे सुरू आहेत त्यांत सुधारणा करण्याचें काम मुंबई सरकारचे मार्फत सुरू आहे ही गोष्ट तुम्हास स्वाभाविक रीतीनें माहित आहेच. ह्या विषयाचे संबंधानें तुम्हीं व इतर उत्तम माहितगार लोकांनीं ज्या सूचना केल्या आहेत त्या सर्व पसंत होवोत अथवा न होवोत, परंतु आम्हास अशी आशा आहे कीं, ह्या बाबदींत कांहीं तरी कायद्याचा फेरफार होऊन रयतेचें हित होणार आहे. देशांत जंगल राखण्याचे संबंधानें तुम्हीं ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या फार शहाणपणाच्या आहेत म्हणून आम्हास मोठा आनंद होत आहे. जंगल राखल्यापासून रयतेचे कोणतेही हक्क न बुडतां देशाचा फार मोठा फायदा होणार आहे. देशांत रान वाढल्यानें गुरें ढोरें चरण्याची सोयही अधिक चांगली होणार आहे व हल्लीं ज्या टेकड्या व डोंगर अगदीं उघडे आहेत त्यांजवर रान वाढलें असतां साधारण लांकडांचा व जळाऊ लांकडांचा पुरवठा अधिक होणार आहे.

पेशव्यांचा मोठा राजवाडा व सर्व महाराष्ट्र देशांतील कौशल्याचें अति उत्तम उदाहरण ज्या नीच पुरूषानें कांहीं तासांत नाहींसें करून टाकिलें त्या नीच पुरूषाच्या अघोर वर्तनाबद्दल आम्हास मोठा तिटकारा आहे व तुम्हासही ह्या अघोर गोष्टीचे संबंधानें आमच्या सारखाच तिटकारा आहे हें योग्य होय.

तुमच्या मनपत्रांत सर्वत्र ठिकाणीं राज्यभक्ति आहे ही गोष्ट आम्ही पूर्ण रीतीनें कबूल करितों. देशांत राहणाऱ्या सर्व प्रजेंत आमचा पूर्ण भरंसा आहे तथापि आमच्यानें असें म्हणवत नाहीं कीं, येवढ्या मोठ्या व चित्रविचित्र प्रजासमूहांत सर्वच इसमांचे मनांत राजकीय संबंधानें जे विचार व कल्पना असणें योग्य आहे, त्या कल्पना व विचार एकसारख्या वास करीत आहेत. राजकीय विषयांचे संबंधानें चुकीचे अभिप्राय ज्या इसमांचे मनांत आहेत ते इसम ह्या प्रजासमूहांत जर असतील तर त्यांस आमचें येवढेंच सांगणें आहे कीं, त्यांनीं देशांतील सांप्रतच्या स्थितीचा विचार फिरून करावा; कारण आम्हास असा भरंवसा आहे कीं, अशा प्रकारच्या इसमांनीं फिरून विचार केला असतां त्यांचे मनाची स्थिति चांगल्या प्रकारची होईल. ह्याच प्रसंगीं आम्ही तुह्मास खात्रीपूर्वक असें सांगतों कीं, राजद्रोह व असंतुष्टता या दोन गोष्टी एक आहेत असें आम्ही कधींही समजत नाहीं. राज्यव्यवस्थेतील दुर्गुणाच्या संबंधानें अथवा एकाद्या विशेष वर्तनक्रमाचे संबंधानें, अथवा एकाद्या विशेष गोष्टीच्या संबंधानें रयतेच्या मनांत असंतुष्टता उत्पन्न होणें हें योग्य होय, व अशा प्रकारच्या असंतुष्टतेचा विचार निरभिमानानें व निःपक्षपात बुद्धीनें करण्यास आम्ही सदैव तयार आहों. आतां ह्या सर्व गोष्टी कशाही असोत आम्ही अखेरीस असें सांगतों कीं, आमच्या साधारण प्रजासमूहापैकीं फार मोठ्या भागाचे राजनिष्ठेवर व सद्विचारावर व विशेषेंकरून वरिष्ट प्रकारच्या प्रजेच्या राजनिष्ठेवर व सद्विचारांवर आमचा खरोखर व मनापासून भरंसा आहे व अशा प्रकारचा भरंसा ठेवण्यास आह्मास हक्कही आहे.

नेक नामदार सर रिचर्ड टेंपल साहेब यांचें वर लिहिलेल्या मतलबाचें संभाषण झाल्यानंतर डेप्युटेशनांतील सर्व गृहस्थांचा मानपान ने० ना० साहेबानीं अति उत्तम रीतीनें ठेविला म्हणून ने० ना० साहेबांचे आम्ही फार आभारी आहोंत असें मि० चिपळोणकर यांनीं बोलून दाखविलें आणि अशा रीतीनें ह्या डेप्युटेशनाचें काम पुरें झालें. ने० ना० साहेबांचे संभाषणांत एतद्देशीय लोकांचे राजनिष्ठेच्या संबंधानें जे विचार प्रगट झाले आहेत ते ने० ना० साहेबांस मोठे भूषणास्पद आहेत येवढेंच नव्हे तर हे विचार सर्व एतद्देशीय प्रजेसही फारच भूषणार्ह आहेत यांत संशय नाहीं. हल्लींच्या प्रसंगीं ने० ना० साहेबानीं आपल्या प्रजेच्या राजनिष्ठेवर पूर्ण भरंसा ठेविला असल्यामुळें त्यानीं सर्व देशावर मोठे उपकार केले आहेत यांत संशय नाहीं व हे महत् उपकार एतद्देशीय सर्व प्रजा कधींही विसरणार नाहीं असें आम्ही खात्रीनें समजतों.

पुणें, ज्ञानप्रकाश, तारीख १७ जुलई १८७९.

आपल्या सुखाकडे लक्ष न पुरवितां आपलें कर्तव्यकर्म उत्तम रीतीनें बजाविलें. नेक नामदार साहेबांनीं अनेक शास्त्रें शिकविण्याच्या संबंधानें आलीकडे जी व्यवस्था केली आहे ती विशेष स्तुत्यर्ह आहे. अमदाबाद येथील कालेज व त्याप्रमाणें पुणें येथील वैद्यकाची शाळा ह्या दोन गोष्टी फारच उत्तम झाल्या. विद्या वृद्धीचें काम नेक नामदार साहेबांनीं विशेष कळकळीनें आपले हातीं घेतलें आहे व या कारणास्तव धारवाड, व कोल्हापूर येथें कालेजाची स्थापना होईल अशी आम्हास पूर्ण आशा आहे. मुंबई येथील युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत फेरफार करून वरिष्ट प्रकारच्या विद्येस व शास्त्राभ्यासास नेक नामदार साहेबांनीं मोठें उत्तेजन दिलें आहे. येथील कालेजांत विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली असल्यामुळें नेक नामदार साहेबांनीं तत्संबंधानें चौकशी करण्याकरितां गतवर्षी एक कमिशन नेमलें व ह्या कमिशनचा रिपोर्ट वाचून नेक नामदार साहेबांनीं रेविन्यू खात्यांतील अमलदारांच्या जागा परीक्षा पसार झालेल्या लोकांस द्याव्या असा ठराव केला व अशा रीतीनें विद्याभ्यासास उत्तेजन देऊन सर्व रयतेवर मोठे उपकार केले. पुणें येथें शेतकीची शाळा स्थापन करणें व त्याचप्रमाणें इतर ठिकाणच्या कांहीं हायस्कुलांस शेतकीचे वर्ग जोडणें ही गोष्ट फारच उत्तम आहे. शेतकीचे संबंधानें रयतेची सुधारणा करण्याकरितां नेक नामदार साहेब विलक्षण झटत आहेत म्हणोन सर्व रयत त्यांची फार आभारी झाली आहे. हिंदुस्थानांतील रयतेपैकीं $\frac{3}{4}$ हून अधिक रयत आपला उदरनिर्वाह शेतकीवर करीत असल्यामुळें ह्या विषयाचें विशेष महत्व आहे. ह्या विषयाचे संबंधानें सभेस अशी सूचना करणें आहे कीं, गांवोंगांव शेतकीच्या शाळा स्थापन करून त्यांचा खर्च लोकलफंडांतून भागवावा म्हणजे सर्व ठिकाणच्या शेतकरी लोकांस शास्त्रोक्त शेतकीचें ज्ञान होणारें आहे. देशांत ठिकठिकाणीं नुक्तेच जे दरोडे पडत होते त्या दरोड्याच्या संबंधानें व पुणें येथील भयंकर अग्निप्रलयाचे संबंधानें एक शब्द बोलल्यावांचून ह्या प्रसंगीं आम्हास राहवत नाहीं. देशांतील दरोडेखोर लोकांस पकडण्याचे संबंधानें नेक नामदार साहेबांनीं जी त्वरित व्यवस्था केली त्या व्यवस्थेबद्दल सर्व रयत फार फार आभारी झाली आहे. सभेस असा भरंसा आहे कीं, पोलीस व लष्करी लोक यांच्या मदतीनें दरोडेखोर लोक एका मागून एक पकडले जाऊन देशांत लवकरच शांतता सुरू होईल, व हल्लीं वर्षाकाळास सुरुवात झाली असून शेतकरी लोकांस भरपूर काम मिळत असल्यामुळें दरोडेखोर लोक नाहींसे होतील. पुणें येथें ज्या अग्निप्रलयानें दोन मोठे नामांकित व लोकप्रिय राजवाडे नाहींसे झाले त्या अग्निप्रलयाचे संबंधानें सभेनें ता० २० मे रोजीं नेक नामदार साहेबांस पत्रद्वारें जाहिर केलेंच आहे कीं, ज्या तीन अधमानीं हें नीच कृत्य केलें ते प्रथमतः सरकारचे स्वाधीन सभेकडून झाले. ह्याचप्रमाणें ह्या अग्निप्रलयापासून सर्व रयतेस झालेलें दुःख व आग विझविण्याचें कामीं रयतेनें केलेली मदत ने० ना० साहेबांस पूर्वीच जाहिर करण्यांत आली आहे. ह्या भयंकर अग्निप्रलयाचें खरें कारण शोधून काढण्याचे कामांत हल्लीं सरकारचे अधिकारी गुंतले असल्यामुळें तत्संबंधानें सभा आपला अभिप्राय आतांच देत नाहीं, परंतु सभेस असा पूर्ण भरंसा आहे कीं, ह्या संबंधानें सर्व खऱ्या गोष्टी लवकरच उजेडांत येतील. ह्या अग्निप्रलयाची चौकशी पूर्ण रीतीनें होण्याची फार जरूर आहे, व हा विषय संशययुक्त स्थितींत ठेवणें बरोबर नाहीं. कारण ह्या संबंधानें अनेक वर्तमानपत्रांतून मनमानेल तसे विचार प्रगट होत असून सरकार आणि प्रजा यांचे दरम्यान व्यर्थ विरोध वाढण्याचा संभव आहे. देशांतील सांप्रतची स्थिति फारच बाईट असून हरएक प्रकारचे कामांत सरकारास मदत देण्यास सभा तयार आहे. देशांतील रयतेचें दुष्काळापासून संरक्षण करण्याकरितां जंगल वाढविण्याविषयीं नेक नामदार साहेबांनीं जी व्यवस्था केली आहे ती फारच उत्तम होय व ह्या व्यवस्थेपासून देशाचा खरोखर मोठा फायदा होणार आहे. पुणें व सोलापूर जिल्ह्यांतील स्थिति हरएक रीतीनें दुष्काळाच्या तोडीची झाली आहे असें समजून नेक नामदार साहेबांनीं जीं रिलीफचीं कामें सुरू केलीं त्याजबद्दल सभा त्यांची फार आभारी आहे. इंदापूर तालुक्यांत सारा वसूल करण्याचें काम नेक नामदार साहेबांनीं तूर्त बंद ठेविलें आहे हेंही अति उत्तम होय. देशांतील रयतेची स्थिति सुधारण्याचे संबंधानें सभेस जे उपाय योग्य वाटले ते सभेनें पूर्वीच सरकारास जाहिर केले व ह्या कामास नेक नामदार साहेब मदत करतील अशी सभेस पूर्ण आशा आहे. एकंदरीनें नेक नामदार साहेबांच्या राज्यव्यवस्थेपासून सर्व प्रजा संतुष्ट आहे.

वर लिहिलेल्या मतलबाचें मानपत्र वाचल्यानंतर नेक नामदार साहेबांनीं उत्तर दिलें. ह्या उत्तरांतील सारांश येणेंप्रमाणें:—

आमचे संबंधानें तुम्हीं जो चांगला अभिप्राय दिला त्याबद्दल आम्हीं तुमचे आभारी आहों, परंतु आमच्या प्रवासाच्या संबंधानें तुम्हीं जी तारीफ केली आहे ती आम्हास कबूल नाहीं; कारण ठिकठिकाणीं जाऊन आपल्या ताब्यांतील रयतेची स्थिति पहावी ही गोष्ट आम्हास संतोषदायक आहे, येवढेंच नव्हे तर हें आमचें कर्तव्यकर्मही होय.

विद्याखात्याच्या संबंधानें सरकारानीं आलीकडे ज्या कित्येक गोष्टी अमलांत आणिल्या त्यांची योग्यता तुम्ही फार उत्तम रीतीनें समजतां ही गोष्ट पाहून आम्हास फार संतोष वाटत आहे. मुंबई येथील युनिव्हर्सिटींत पदार्थविज्ञानशास्त्राचे संबंधानें जी नवीन परीक्षा सुरू केली आहे ती त्या परीक्षेस जाण्याविषयीं तुम्ही आपले तरुण व विद्वान असे नातेवाइकांस व स्नेह्यांस उत्तेजन द्यावें म्हणजे चांगलें होईल. शेतकीचें काम शास्त्रोक्त रीतीनें कसें चालवावें ही गोष्ट शेतकरी लोकांस अनुभवसहित शिकविली असतां त्यांचा मोठा फायदा होणार आहे. पदार्थविज्ञानशास्त्राचा अभ्यास वाढत असून इतर जुन्या विषयांचीही हेळसांड होऊं नये अशी आमची इच्छा आहे, व ह्या इच्छेस अनुसरून आम्हीं अमदाबाद येथें एक नवीन कालेज स्थापन केलें आहे व विद्यार्थी लोक तयार झाल्यास अशीं विद्यालयें ठिकठिकाणीं स्थापन करण्याचा निश्चय आम्हीं केला आहे. वर लिहिलेल्या इच्छेस अनुसरून आम्हीं आणखी असाही ठराव केला आहे कीं, युनिव्हर्सिटीच्या परीक्षा ज्या इसमांनीं दिल्या असतील त्यांसच रेविन्यू खात्यांतील वरिष्ट अमलदारांच्या जागा देण्यांत याव्या.

महाराष्ट्र देशांतील सरदार व राजेरजवाडे यांचीं घराणीं निरंतर कायम राहून त्यांस उत्तरोत्तर उर्जित दशा प्राप्त व्हावी ही गोष्ट सरकारास फारच प्रिय असल्यामुळें कोल्हापूर येथें सरदार व राजेरजवाडे यांचे मुलांकरितां एक शाळा व एक कालेज स्थापन करावें म्हणोन तुम्हीं जी सूचना केली आहे ती आम्हास फार पसंत आहे. आम्हास असा भरंसा आहे कीं, हिंदु लोकांत वरिष्ट प्रकारच्या विद्येचा फैलाव होत गेला म्हणजे ते आणि इंग्रज सरकार यांचें दरम्यान अधिक निकट व सप्रेम संबंध जडणार आहे; कारण उभय पक्षांची भाषा एक होऊन त्यांचे विचारही एकाच जातीचे होणार आहेत. सरकारांतून साधारण विद्याखात्याची व्यवस्था उत्तम रीतीनें सुरू असतांही नीतिशास्त्राचे शिक्षणाकडे सरकारानें विशेष लक्ष दिलें पाहिजे; कारण सर्व सुधारलेल्या देशांत नीतिशास्त्राचा मोठा मान आहे इतकेंच नव्हे तर हिंदु लोकांच्या सर्व पुरातन व पूज्य ग्रंथांत नीतिशास्त्रास मोठें महत्व दिलें आहे. वैद्यकाचा फैलाव होण्याकरितां ज्या शाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत त्या शाळांतील शिक्षणापासून शहर दुरुस्ती व स्वच्छता राखण्याचें काम विशेष चांगल्या रीतीनें चालून रयतेचें अयुष्य मान वाढेल, रोगांचें प्राबल्य कमी होईल, व रयत अधिक शक्तिमान होईल असें आमचें अनुमान आहे.

देशांतील पूर्वभागांत हल्लीं रयतेस दुष्काळाचे संबंधानें जीं दुःखें भोगावीं लागत आहेत तीं लवकरच नाहींशीं होतील अशी तुम्हास आशा आहे, व आह्मासही अशीच आशा आहे, परंतु तुम्हास असें माहितच असेल कीं, सदर्हू प्रदेशांत दुष्काळ व रोगराई यांजपासून उत्पन्न होणाऱ्या भीतीचीं कांहीं कारणें अद्याप कायम आहेत. मध्यंतरी दुष्काळपीडित लोकांस मदत देण्याचें काम सुरू आहे, व ह्या कामाचा व्यवस्था अशा रीतीनें करण्यांत आली आहे कीं, ह्या व्यवस्थेपासून उत्तरोत्तर देशाचें कल्याण होणार आहे.

देशांत जे दरोडे पडत होते ते ताबडतोब बंद करण्याच्या इराद्यानें सरकार मार्फत सैन्य धाडण्यांत आलें. ह्या व्यवस्थेची तुम्हीं जी तारीफ केली आहे ती योग्य आहे. दरोडे बंद करण्याचें काम विशेष स्वरूप रीतीनें शेवटास गेलें; कारण शेतकरी लोकांचा ह्या दरो-

येथील सार्वजनिक सभेकडून मे० कलेक्टर साहेब यांजकडे गेलेलें डेप्युटेशन.

हल्लीं ठिकठिकाणीं जे दरवडे पडत आहेत ते दरवडे घालणाऱ्या चोरटे लोकांस कोणी उत्तेजन दिलें, व त्याचप्रमाणें येथें नुक्ताच जो भयंकर अग्निप्रलय झाला त्या अग्निप्रलयाचा दरवडेखोर लोकांशीं संबंध आहे किंवा कसें वगैरे गोष्टींचा नीट रीतीनें तपास लावण्याचे कामीं सांप्रत सरकारचे अधिकारी गुंतले आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. दरवडेखोर लोकांकडे सरकारचें लक्ष हल्लीं जितक्या सक्तीनें लागलें आहे तितक्या सक्तीनें जर हें लक्ष पूर्वीच ह्या विषयाकडे लागलें असतें तर दरवडेखोर लोकांचा उत्कर्ष कधींच झाला नसता. दरवडेखोर लोकांचा ह्या इलाख्यांतून बीमोड करून टाकण्याचा सरकारानें हल्लीं जो निश्चय केला आहे तो फारच उत्तम होय, व असें करून आपल्या अनाथ रयतेच्या जिवाचें व मालमत्तेचें संरक्षण करणें हें सरकारचें कर्तव्यकर्मच आहे असें समजलें पाहिजे. दरवडेखोर लोकांस पकडण्याविषयीं हल्लीं लष्करी लोक धाडण्यांत आले आहेत, व ते आपलें काम उत्तम रीतीनें बजावून दरवडेखोर लोकांचें नांव देखील शिलक राहूं देणार नाहींत यांत तिळमात्र संशय नाहीं. आतां ह्या दरवडेखोर लोकांस उत्तेजन कोणापासून मिळालें अथवा ते कांहीं अन्य कारणानें ह्या कुमार्गास लागले ह्या गोष्टीचा तपास बारकाईनें करणें फारच अवश्य आहे, परंतु ह्या कामांत सरकारी अधिकाऱ्यांचें धोरण न चुकतां योग्य मार्गानें त्यांनीं चौकशी केल्यास त्यांस यश मिळून सर्व गोष्टींचा यथास्थित रीतीनें निकाल लागणार आहे. हल्लीं लोकवार्तेप्रमाणें कांहीं सरकारी अधिकाऱ्यांचा असा गृह झाला आहे कीं, येथील सुशिक्षित व विद्वान ब्राम्हणांनींच ह्या दरवडेखोर लोकांस फिसालत दिली, व ब्राम्हणांनींच बुधवारचे वाड्यास व विश्रामबागचे वाड्यास आग लाविली, परंतु हा अभिप्राय सर्वतो प्रकारें चुकीचा होय असें आम्ही समजतों. ह्या संबंधानें दुसरी लोकवार्ता अशी आहे कीं, येथील सार्वजनिक सभा ह्या सर्व घोंटाळ्याची उत्पादक होय, परंतु हीही विलक्षण चूक समजली पाहिजे. ज्या ब्राम्हण लोकांस विद्यामृत प्राशन करण्यास मिळालें आहे, व ज्यांचीं मनें विद्येनें संस्कृत झालीं आहेत त्यांचे हातून वर लिहिलेलीं अघोर कृत्यें घडतील अशी कल्पना देखील करणें मोठा अन्याय होय. वासुदेव बळवंत फडके नांवाचा कोणी ब्राम्हण दरवडेखोर लोकांचा नायक आहे, व केशव नांवाचा ब्राह्मण मी बुधवारचे वाड्यास व विश्रामबागचे वाड्यास आग लाविली असें कबूल करीत आहे येवढ्या गोष्टीवरून सर्व ब्राम्हण ज्ञातीवर आरोप ठेवणें अथवा त्यांचा संशय घेणें ही मूर्खपणाची सिमा होय असें आम्हास वाटतें. असतु येथील कलेक्टर मेहेरबान मूर साहेब यांचा अभिप्राय वर लिहिल्याप्रमाणें नाहीं ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. दरवडेखोर लोकांच्या संबंधानें येथील सार्वजनिक सभेकडून एक डेप्युटेशन ता० २२ मिनहू रोजीं मेहेरबान मूर साहेब यांजकडे गेलें होतें. ह्या डेप्युटेशनांत जे गृहस्थ होते त्यांचीं नांवें येणेप्रमाणें:—राव बहादूर श्रीनिवास शेषो, सभेच्या म्यानेजिंग कमिटीचे चेरमन व दक्षण भागच्या रेविन्यू कमिशनर साहेबांचे माजी नेटिव असिस्टंट, राव बहादूर सदाशिव बल्लाळ गौंडे सभेचे आनररी सेक्रेटरी व माजी असिस्टंट इनाम सेटलमेंट आफिसर, राव बहादूर चिंतामणराव हरी देशमुख माजी सब्बार्डिनेट जज्ज, मि० भाऊ साहेब नातु एक सरदार, मि० तात्या साहेब रास्ते सरदार, मि० तात्या साहेब राजमाचीकर सरदार, मि० गणेश वासुदेव जोशी वकील दिस्त्रिक्ट कोर्ट पुणें, मि० शिवराम बापूजी कोल्हटकर वकील निसबत मिरजकर, मि० गणेश भिकाजी मराठे, मि० शिताराम हरी चिपळुणकर सभेच्या जर्नलचे एडिटर आणि मि० शिवराम हरी साठे सभेचे सेक्रेटरी. वर लिहिलेल्या गृहस्थांचें डेप्युटेशन मेहेरबान मूर साहेब यांजकडे गेल्यानंतर राव बहादूर सदाशिव बल्लाळ गौंडे आनररी सेक्रेटरी यांणीं मेहेरबान साहेबांस सर्व गृहस्थांची मुलाखत करून दिली, व डेप्युटेशनचा आदर सत्कार मेहेरबान साहेबांनीं अति उत्तम रीतीनें ठेविला. प्रथमारंभीं मेहेरबान मूर साहेब व राव बहादूर श्रीनिवास शेषो या उभयतांचे दरम्यान कांहीं खासगी रीतीचें संभाषण झाल्यानंतर मि० शिताराम हरी चिपळुणकर यांणीं सभेच्या वतीनें मेहेरबान साहेबांस असें जाहिर केलें कीं, पुणें शहरांत नुक्ताच जो अग्निप्रलय झाला त्या अग्निप्रलयाच्या संबंधानें सभेस विलक्षण दुःख होत आहे, व सांप्रतच्या बिकट प्रसंगीं सरकारास आपली मदत देण्यास सभा तयार आहे. मि० चिपळुणकर यांणीं मेहेरबान साहेबांस आणखी असें जाहिर केलें कीं, बुधवारचा वाडा व विश्रामबागचा वाडा ह्या दोन्हीही सार्वजनिक इमारतींचे संबंधानें येथील लोकांस मोठी पूज्यबुद्धी होती; कारण प्रथमतः हे वाडे माजी पेशव्यांच्या कारकिर्दीचें भूषण होतें, व दुसरी गोष्ट अशी कीं, इंग्रज सरकारच्या अमलास सुरुवात झाल्यापासून दोन्हीही वाडे व विशेषतः विश्रामबागचा वाडा विद्याभ्यासाचे कामाकडे लावण्यांत आला होता, व या कारणामुळें या दोन इमारतींच्या नाशापासून सर्व लोकांस मोठी हाळहाळ वाटत आहे. मेहेरबान मूर साहेब यांस वर लिहिलेल्या सर्व गोष्टी अनुमत झाल्या, व त्यांणीं असें बोलून दाखविलें कीं, हल्लींच्या बिकट प्रसंगीं सरकारास हरएक प्रकारची मदत देण्यास सभा तयार आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. येथील भयंकर जळिताचे खरे उत्पादक जे इसम असतील त्यांस शोधून काढण्याचे कामास सभेनें मेहनत करावी असें उत्तेजनपर बोलून मेहेरबान मूर साहेब यांणीं आणखी असेंही सांगितलें कीं, ह्या कामांत जरी सभेस पुष्कळ वेळपर्यंत यश मिळणार नाहीं असें दिसतें, तथापि त्यांनीं आपले श्रम एकसारखे सुरू ठेवावे. मेहेरबान साहेब आणखी असें बोलले कीं, ह्या भयंकर जळिताचे जे उत्पादक असतील ते पुणें शहरांतील लोकांचे खरे शत्रु समजले पाहिजेत; कारण त्यांनीं अशा नामांकित प्राचीन इमारतींचा विध्वंस केला. मेहेरबान साहेब आणखी असें म्हणाले कीं, मुंबई येथील एका वर्तमानपत्रकर्त्यानें शहरांतील प्रत्येक आग कोणी मुद्दाम लाविली असें छापलें आहे, व ह्या अग्निप्रलयाचे संबंधानें फाजील मजकूर सदर्हू पत्रांत प्रसिद्ध झाले आहेत ही गोष्ट अयोग्य होय. आम्ही (मि० मूर) फडक्यांचे वाड्यांत स्वतः गेलों होतों, परंतु तेथें वर्तमानपत्रांतील हकीकतीप्रमाणें आम्हास किरोसन तेलाचा वासही आला नाहीं अथवा एकादा मोठा काकडा आमचे पाहण्यांत आला नाहीं. ता० १३ मिनहूचे नंतर शहरांत ज्या ठिकठिकाणीं आगी लागल्या त्या हरएक रीतीनें अकस्मिक असोन त्यांचा थोरले आगीशीं कांहींएक संबंध नव्हता. वर लिहिल्याप्रमाणें संभाषण झाल्यानंतर कांहीं किरकोळ गोष्टींचे संबंधानें बोलणें होऊन डेप्युटेशन सायंकाळचे पांच वाजल्यानंतर माघारें आलें. डेप्युटेशनांतील गृहस्थ परत जावयास निघाले तोंच मेहेरबान मूर साहेब यांणीं आणखी त्यांस असें सांगितलें कीं, ज्या इसमांचे संबंधानें सभेस संशय येईल त्या इसमांस कैदी करण्याचे कामांत सभेस मदत देण्यास सरकार फार खुष आहे. सभेच्या डेप्युटेशनाचा मेहेरबान साहेबांकडून जो सत्कार झाला त्याजमुळें व मेहेरबान साहेबांच्या अभिप्रायामुळें येथील लोकांची चित्तवृत्ति पुष्कळ अंशानें शांत झाली आहे, व हल्लीं शहरवाशी लोकांस पूर्वापेक्षां अधिक स्वस्थ वाटत आहे. मेहेरबान मूर साहेब यांणीं हल्लीं ज्या रीतीनें चौकशी सुरू केली आहे त्या रीतीनें अखेरपर्यंत मेहेरबान साहेबांचा वर्तनक्रम सुरू राहिल्यास सर्व गोष्टींचा योग्य रीतीनें उलगडा होण्याचा संभव आहे. कोणत्याही प्रसंगीं एकादा हेकडपणाचा अभिप्राय धरला असतां इष्ट हेतु सिद्धीस जात नाहीं व ही गोष्ट तर हल्लींच्या प्रसंगास विशेष रीतीनें लागू आहे. मेहेरबान साहेबांनीं हरएक रीतीचा दुराग्रह सोडून देऊन चौकशीचा क्रम सुरू ठेविल्यास त्यांस यश मिळण्याचा निःसंशय संभव आहे.

पुणें, ज्ञानप्रकाश, तारीख २६ मे १८७९.

श्री.

पुणें, सार्वजनिकसभेचें दफ्तर.

ता. 31 मार्च सन १९०९

वि. वि.

विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं सार्वजनिक सभेच्या सभासदांची साधारण (general) सभा, खालील गोष्टींचा विचार करण्याकरितां, शनिवार, ता. दहा ३० माहे एप्रील १९०९ रोजीं सायंकाळीं सहा वाजतां जोशी-हालांत भरणार आहे; तरी त्या वेळीं आपण अगत्य येण्याचें करावें. कळावे हे विनंति.

१. शके १८२९/30 सालचें रिपोर्ट पास करणें.

२. शके १८३१ सालाकरितां 'सभेचे कामगार' नेमणें.

3. किरकोळ.

न. चिं. केळकर

चिटणीस सार्वजनिक सभा, पुणें.

सर्वत्रांस परम आनंद होईल; आणि महाराणी साहेबांनीं चक्रवर्तिनी ही पदवी स्वीकारलेला दिवस मोठा पुण्य दिवस असें सर्व हिंदू प्रजा मानूं लागेल.

गुरुराव श्रीनिवास.
सदाशिव कृष्ण गोखले.
कृष्णराव रोदकर
नरसिंव्हाचार्य सबदी.
श्रीनिवासाचार्य.
भीमराव कृष्ण कारकून.
श्रीनिवासाचार्य कौलगी.
नारायण रंगो कारकून.
रामचंद्र बाळाजी सौदत्ती.
वेंकाजी पांडुरंग कारकून.
सुब्बाजी कृष्ण हरडीकर.
वेंकाजी शिवराव कारकून
भीमाजी मनोहर कारकून
पांडुरंग राघवेंद्र कारकून
शंकरपा जवळी वकील.
नरसो तंमाजी कारकून
गोपाळाचार्य वकील.
तिपण्णा ठिकारे दुकानदार
करवसप्पा उचगेरी
गगप्पा जवळी
लक्ष्मण रामचंद्र गलगली
श्रीसलप्पा हुंडेकर
स्वामीराव व.
भीमसेनाचार्य पांडुरंगी
राघवेंद्रराव देसाई

गोविंदराव वकील.
राघवेंद्रराव तेरगोंडकर.
गोविंद कृष्ण अंबरडेकर.
रामराव सुब्बाजी.
कृष्णराव राटी.
रंगोजिवाजी कारकून.
तंमण्णाचार्य.
कृष्णाचार्य राटी.
बाळकृष्ण गुरुराव बंमिगट्टी
गुरुसिद्दप्पा गिलगंची.
वेंकटराव सखाराम.
वीरप्पा कारकून.
विरपाक्षप्पा नकाशाकारकून
अ० शि० बाळकृष्णअय्या
सुबराव रामचंद्र.
वेंकाजी नरसिंह जमखंडी
येशवंतरावजी
बाळाजी रामचंद्र
गोपाळ श्रीपति
बरजोरजी वैरामजी
गंगाधरप्पा गरग
विरप्पा निलगुंद
तंमण्णा धारवाड
कृष्णरावजोशी
पांडुरंग भिकाजी फडके

तिरमलराव श्रीनिवास.
रामचंद्र पुटराव सिकारपुरकर.
भीमसेनाचार्य तोनसी.
मध्वाचार्य धारवाड.
शेषो रामचंद्र कारकून.
नारायणाचार्य गदग.
केशव कृष्ण राटी.
गुरुनाथ नरसोबा नाईक.
लोकनाथ मयाराम शुक्ल.
तंमाजी कृष्ण कळसापूर.
रामचंद्र अप्पुराव कारकून.
परप्पा अ० कारकून.
स्वामीराव वकील.
रामलिंग मुदलिअर.
कल्लोनीलकंट वकील.
भिमाचार्य वकील
अंणाचार्य प्याटी
चन्नप्पा दांडिन
वेंकाजी नरसिंह कुलकर्णी
रंगो नारायण किर्लोसकर
सुबानप्पा
शेषगीर वेंकटेश
नरसिंगराव सरवीर
हणमंत जिवाजी
आंणाजी नरसिंह कानडे

———o(O)o———

D. V. Press.

૧૦ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીન ઉપર ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

૯ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીન ઉપર ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

૮ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીનમાં ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

૭ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીનમાં ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

૬ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીનમાં ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

૫ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીનમાં ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

૪ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીનમાં ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

૩ ઉપરોક્ત જણાવેલ ખેતીની જમીનમાં ખેતી સિવાય બીજો કોઈ પણ ધંધો કરવામાં આવશે નહિ.

॥श्री॥

वज्रचुडे मंडित सौभाग्यवतीस पुणेंसार्वजनिकसभा,, वाई वास्तव्य ग्रहर पुणेंसभा भरण्या

चेंस्थल सदाशिव पेठेंतील फडनऱ्यांच्या चा दिवाण खाना यांचे शेवस.

गोपाळ वळवंत अभ्यंकर सरकारीमराठी शाळेचामास्तर याणें दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणांवर मस्तक ठेऊन

कृतानेक अनंत कोटीं सिरसाष्टांग नमस्कार विज्ञप्ती विशेष शके १७९९ वाच्या कार्तिक शुद्ध १ बुधवार सायंकाळ

पावेतों या राजाधिराज महाराज परमेश्वराचे कृपेनें इंदापूर तालुक्यांतील भिगवण गांवींशरीरानें मात्र अगदीं सुरक्षि

त आहे परंतु मनानें (माझ्या प्रिय देशबांधवांवर ओढ वलेल्या महासंकठानें) अत्यंत दिलगिर असा आहेआप

णाकडून मजला जावक न ११७ तारीख १२ अक्टंबर १८७६ इ.चें अज्ञापत्र आलें यांत आपण विचारलेली

माहिती आपणास सांगंत आणि तपशिलवार पुढें दाखवितों.

प्रश्नपहिला यांत

१ साल मजकुरीं या इंदापूर तालुक्यांत परजन्य किती पडला असें आपण विचारिलेंआहे त्याचें

उत्तर

लाहोर येथील बड्या दरबारांत आपण मोळ्या सदय व मोकळ्या अंत:करणानें सर्वत्रांस असें अभय वचन दिलें आहे कीं, आम्ही हिंदुस्थानांतील राज्यकारभार चालवीत असतां नेहमीं आमचे हातून होईल तितक्या रीतीनें लार्ड लारेन्स साहेबांच्या वर्तन क्रमाचें अनुकरण करूं, व ते ज्या मूलतत्वास अनुसरून राज्यव्यवस्था चालवीत असत तींच मूलतत्वें आम्ही आपले वर्तनास आधारभुत घेऊं. ह्या आपल्या अभय वचनानें हिंदुस्थान देशांतील सर्व प्रजेस मोठा आनंद झाला आहे. लार्ड लारेन्स साहेबांची इकडे जी कीर्ति झाली आहे त्यांत मुख्य गोष्ट अशी आहे कीं, ते हिंदुस्थानचे सरहद्दीवरील व तिचे पलीकडील स्वतंत्र संस्थानांतील राज्यव्यवस्थेंत तिळमात्र हात घालीत नसत, व हाच वर्तनक्रम आपण पूर्ण रीतीनें स्वीकारला आहे यावरून सर्वत्र ठिकाणीं असा विश्वास व आशा उत्पन्न झाली आहे कीं, हिंदुस्थान सरकारचे मनांत व विलायत सरकारचे मनांत शांतता कायम ठेविण्याची इच्छा सबळ रीतीनें वास करीत आहे. हिंदुस्थानांतील एका विख्यात राजनीतिज्ञ पुरुषानें असें म्हटलें आहे कीं, ह्या देशाचे सरहद्दी पलीकडील स्वतंत्र संस्थानांत ढवळाढवळ न करितां त्यांच्या संबंधानें शांततेनें वागणें म्हणजे खुद्द ह्या देशांतील राज्यव्यवस्थेकडे पूर्ण रीतीनें सरकारचें लक्ष लागणें होय, व या कारणास्तव अफगाणिस्थानांतील लढाईचा शेवट झाला ही गोष्ट ऐकून आम्हास अत्यानंद होत आहे. अफगाणिस्थानच्या संबंधानें शांतता सुरू झाली म्हणजे हिंदुस्थान देशांतील प्रजेचें हित करण्यास व त्यांची संपत्ति वाढविण्यास राज्यव्यवस्थेंत ज्या सुधारणुका सुरू करणें अवश्य आहेत तिकडे सरकारास लक्ष पोंचविण्यास फुरसद मिळणार आहे. ह्या अवश्य सुधारणुकांपैकीं कांहीं गोष्टी आम्ही नुकत्याच नेक नामदार साहेबांस जाहीर केल्या आहेत, सबब त्यांचा येथें फिरून उल्लेख करून आम्ही नेक नामदार साहेबांचा वेळ व्यर्थ खर्ची घालीत नाहीं.

आपली स्वारी पंजाब व सिंध प्रांतांत नुक्तीच फिरत असतां आपण एके प्रसंगीं असें बोलून दाखविलें आहे कीं, हिंदुस्थान देशांतील म्युनिसिपाल कमेट्यांकडे विशेष रीतीनें लक्ष पुरविण्याविषयीं दयाळू राणी साहेबानीं आपल्यास हुकूम केला आहे; कारण स्वत:चा राज्यकारभार स्वतंत्र रीतीनें चालविण्याची विद्या एतद्देशीय लोकांस म्युनिसिपाल कमेटींतच मिळणारी आहे. आपले हे शब्द ऐकून सर्व प्रजेस मोठा आनंद झाला आहे. ज्या ज्या शहरांतील प्रजा विद्येनें, बुद्धीनें व इतर सार्वजनिक गुणानें पुढें सरसावली आहे त्या त्या ठिकाणच्या लोकांस तर आपले हे उदार शब्द ऐकून अत्यानंद झाला आहे, व इतिहासप्रसिद्ध पुणें शहरांतील सुधारलेल्या रयतेप्रमाणें त्यांसही अशी आशा आहे कीं, म्युनिसिपाल कमिशनर निवडण्याचा हक्क आपल्यास लवकरच स्थानिक सरकारचे मदतीनें मिळणार आहे. इलाखे शहरांतील रयतेस हा अधिकार दिल्यापासून जे अत्युत्तम परिणाम घडून आले आहेत त्याजबद्दल ब्रिटिश इंडियन सरकारानें अत्यानंद मानावा हें न्यायाचेंच आहे. आपले म्युनिसिपाल कमिशनर्स निवडण्याचा हक्क हळू हळू लहान मोळ्या दुसऱ्या शहरांतील रयतेस देणें म्हणजे सर्व शक्तीमान परमेश्वरानें ब्रिटिश सरकाराकडे ह्या जुनाट देशाची राजकीय संबंधानें व इतर गोष्टींच्या संबंधानें सुधारणा करण्याचें जें जोखमीचें काम सोंपविलें आहे तें उत्तम रीतीनें व इमानानें व निश्चयानें बजावणें होय असें आम्ही समजतों.

इकडील व पाश्चिमात्य विद्येपैकीं वरिष्ठ व अगत्याच्या भागास सारखेंच उत्तेजन द्यावें असा आपला अभिप्राय आहे ही गोष्ट ऐकून सभेस फार समाधान वाटत आहे; कारण ह्या अतिउत्तम संमेलनानें एतद्देशीय भाषांचे अभ्यासांत ज्या विशेष मौल्यवान व महत्वाच्या गोष्टी आहेत त्यांचें संरक्षण होऊन हिंदुस्थानांतील निरानिराळ्या जातींचे लोकांची सुधारणा होणार आहे, व ह्या सर्व जातींत राजकीय संबंधानें परकीय भाव मोडून एक विचार निश्चयानें होणार आहे. हिंदुस्थान देश हा फार विस्तीर्ण आहे व त्यांत निरनिराळ्या जातींचे, धर्मांचे, भाषेचे व रीतीभातींचे निरनिराळे लोक राहात आहेत ही गोष्ट आपल्यास विदितच आहे, व ह्या देशाची सुधारणा होणें ह्या शब्दांचा सर्व लोक जो अर्थ करीत आहेत त्या अर्थानें ही सुधारणा होण्यास वर लिहिलेल्या सर्व जातींचें राजकीय संबंधानें संमेलन होणें ही गोष्ट सर्वांशीं फार अगत्याची आहे. वर लिहिलेला हा इष्ट उद्देश सिद्ध होण्यास वरिष्ठ प्रकारच्या इंग्रजी विद्येचा फैलाव जितका उपयोगी पडणार आहे तितकी दुसरी कोणतीही गोष्ट उपयोगी पडणार नाहीं. सभेचा नेहमी असा अभिप्राय आहे कीं, वरिष्ठ प्रकारची इंग्रजी विद्या ही हिंदुस्थान देशास फार चांगल्या रीतीनें सुधारीत आहे व या कारणामुळें लार्ड मेटकाफ, लार्ड मेकाले व इतर नामांकित मुच्छद्यांनीं विद्याखात्याच्या संबंधानें जी अति उत्तम व्यवस्था पूर्वीपार लावून दिली आहे व जी सन १८५४ इसवी सालांतील खलित्यानें दृढतर झाली तीच व्यवस्था आपण कायम ठेवणार हें ऐकून सभेस अत्यानंद झाला आहे.

राणी सरकारचे हुकुमावरून आपण लाहोर येथील दरबारांत हिंदुस्थानांतील राजे रजवाडे व सरदार यांस असा सदुपदेश केला आहे कीं, त्यानीं आपापले अमलांतील प्रजेचें जिकडून बरें होईल ती गोष्ट स्वीकारून तदनरूप अपापल्या मुलखांतील राज्यकारभार चालवावा. ह्याच प्रसंगीं आपण ह्या राजे रजवाड्यांचे मनांत असेंही ठसवून दिलें आहे कीं, एखाद्या संस्थानचा मोठेपणा व थोरवी किती आहे याचा अंदाज करण्याच्या कामांत इंग्रज सरकार संस्थानांतील दरबाराचे दैदीप्यपणाकडे अथवा संस्थानांतील सैन्याचे अति उत्तम तयारीकडे व बलाकडे लक्ष देत नाहीं, परंतु संस्थानांतील प्रत्येक तऱ्हेची प्रजा किती अंशानें संतुष्ट व सुखी आहे ह्याच गोष्टीकडे आपलें पूर्ण लक्ष पोंहोचवितें. आपण वर लिहिल्याप्रमाणें एतद्देशीय संस्थानिक व राजेरजवाडे यांस जो अति उत्तम सदुपदेश केला आहे त्याजवरून असें स्पष्ट रीतीनें दिसून येतें कीं, एतद्देशीय संस्थानांतील प्रजेचें सुख चिरकाळ वृद्धिंगत व्हावें अशी आपणास व इंग्रज सरकारास पूर्ण इच्छा व कळकळ आहे. इंग्रज सरकाराकडे हिंदुस्थानांतील सार्वभौमपणाचा अधिकार असल्यामुळें त्यानीं एतद्देशीय संस्थानांतील प्रजेचें चिरकाळ हित व्हावें म्हणून जे सर्व योग्य उपाय असतील ते सदैव अमलांत आणावे हा त्यांस निःसंशय पूर्ण अधिकार आहे व आपण जो हा सदुपदेश केला आहे तो एतद्देशीय संस्थानिक व त्यांचे जबाबदार कारभारी नेहेमी मनांत जागृत ठेवतील अशी आम्हास आशा आहे.

आर्म्स् आक्ट (हत्यारांचे संबंधाचा कायदा) यांतील ठराव फार सक्तीनें अमलांत आणूं नयेत व ज्या शेतकऱ्यांचे शेतांवर रानटी जनावरांचा हल्ला होण्याचा विशेष संभव आहे त्यांस फी घेतल्याशिवाय परवाने द्यावेत असा हुकूम आपण जिल्ह्याचे अधिकाऱ्यांस आपले कारकीर्दीची सुरुवात झाल्या नंतर इतक्या थोडक्या कालांत दिलात म्हणून सभा आपली फार फार आभारी आहे. हत्यारांचे संबंधाचा हा कायदा कायम राहिल्यास एतद्देशीय लोकांच्या ज्या राजनिष्ठेचे संबंधानें आपण व आपल्या मागील विख्यात कामगार यांनीं अनेक वेळ मोठी शिफारस केली आहे त्या राजनिष्ठेवर मोठा कलंक आहे म्हणून तो अजिबात रद्द करण्याची फुरसत आपल्यास काळगतीनें मिळेल अशी सभेस पूर्ण आशा आहे.

वर लिहिलेल्या मतलबाचें सभेचें मानपत्र वाचल्यानंतर त्यास नेक नामदार व्हाइसराय साहेबानीं मोळ्या उत्तम रीतीनें उत्तर दिलें. हें उत्तर विलायतेंतील लोकांस फारच पसंत पडलें आहे असें लंडन येथून ता० ६ मिनह्र रोजीं आलेल्या तारेवरून कळतें. नेक नामदार व्हाइसराय व गवरनर जनरल साहेबांचे उत्तरांतील तात्पर्य येणेंप्रमाणें:—

तुम्हीं आम्हास जें मानपत्र दिलें त्याजबद्दल आम्ही तुमचे फार आभारी आहोंत. आम्ही तुम्हास खात्रीपूर्वक असें सांगतों कीं, इलाख्याचे गवरनर साहेब यांच्या मदतीनें आम्हीं पुणें शहर

PUBLIC MEETING IN AID OF LOCAL SANITARY REFORM.

At a public meeting held under presidency of Rao Bahadur Hari Raoji Chiplonkar on the 15th of January 1888, in Gadre's wada the following Resolutions were unanimously passed :—

Proposed by Rao Bahadur M. G. Ranade, seconded by Mr. Gopal Ganesh Agarkar :—

I That this meeting, while expressing its gratitude to Government for the present constitution of the Poona Municipality, which is based on popular representation is at the same time of opinion that as cholera threatens to be a periodical epidemic in this city, the Poona Municipality should recognize the necessity of taking more vigorous action in stamping out the present epidemic, and in taking such steps to improve the general sanitary condition of the city as may be deemed necessary as a precaution against the reappearance of the disease.

Proposed by Rao Bahadur Krishnaji Laxuman Nulkar, seconded by Rao Bahadur Khanderao Chimanrao Bedarkar.

II That this meeting has read with satisfaction the several recommendations of the recent Poona Sanitary Commission sanctioned in Government Resolution No. 3662 dated the 6th December 1887; and regarding the proper Sanitation and effectual Conservancy of the city as a matter of paramount importance to the health of the city and its envirous, the meeting considers it to be its duty to press upon both Government and the Municipality the necessity of giving speedy effect to those recommendations and the meeting accordingly requests that the Government should issue orders to their officers to close the Irrigation channels, as recommended by the Government Sanitary Committee, as speedily as practicable, without waiting for estimates for compensation, and without reference to financial considerations.

2. Government should issue orders that steps may be taken to make the Khadakwasla Canal staunch, as recommended by the same Commission, as speedily as practicable.

3. The Municipality should take steps to thoroughly empty and cleanse the old main drains, gutters, and privies, and provide for more or better ones where wanted; and to maintain those works of Drainage and Conservancy in an efficient condition, so as to secure their proper working without interruption or failure.

4. The Municipality to take steps to ensure the purity of the water supply of the City at present obtained from different sources, by 1stly universally using iron pipes all through the city [illegible]
2ndly by providing [illegible]
of filtering [illegible]

सोमवार, मार्गशीर्ष शुद्ध ५ शके १८०२.

नेक नामदार व्हाइसराय साहेब यांचें आगमन.

H. E. LORD RIPON ARRIVAL AT POONA.

नेक नामदार लार्ड रिपन हिंदुस्थानचे व्हाइसराय व गवरनर जनरल यांची स्वारी येथें गेले गुरूवारीं येऊन दाखल झाली. नेक नामदार साहेब खडकी येथील स्टेशनावर उतरावयाचे असल्यामुळें सदर्हू ठिकाणीं फार चांगल्या रीतीनें व्यवस्था करण्यांत आली होती. ठिकठिकाणीं सुंदर व रंगी बेरंगी निशाणें लाविलीं होतीं, व निरानिराळ्या प्रकारच्या वेलीनीं व पुष्पांनीं सर्व स्टेशन सुशोभित केलें होतें. स्टेशनचे प्लाटफार्मावर तांबडें कापड हातरलें असून सर्व देखावा जितका मनोहर व शोभादायक करवेल तितका तो केला होता. नेक नामदार साहेबांचें आदरातिथ्य करण्याकरितां येथील सरकारी सर्व बडे कामगार व शहरांतील कांहीं शिष्ट व थोर गृहस्थ मि० मूर साहेब जिल्ह्याचे कलेक्टर यांचे निमंत्रण पात्रिकेवरून स्टेशनावर हजर होते, व याशिवाय रेल्वे व्हालिंटियरची एक कंपनी व सरकारी रायल आर्टिलरी व पायदळ पलटणींपैकीं १०० शिपायी असे हजर होते. नेक नामदार साहेबांची स्पेशल ट्रेन ज्या वेळेस यावयाची म्हणून नियम ठरला होता त्याचे पूर्वीच ती सुमारें पाव तास येऊन दाखल झाली, परंतु या कारणामुळें आगत स्वागताचे व्यवस्थेंत कोणत्याही रीतीनें व्यंग झालें नाहीं. नेक नामदार व्हाइसराय साहेबांची गाडी स्टेशनांत येऊन दाखल झाल्याबरोबर त्यांस रेल्वे व्हालंटियर कंपनीनें लश्करी मानपान दिला, व लागलीच नेक नामदार व्हाइसराय साहेबांची स्वारी गाडींतून खालीं उतरली. नेक नामदार व्हाइसराय साहेबांबरोबर नेक नामदार सर जेम्स फर्ग्युसन मुंबई इलाख्याचे गवरनर होते, व त्यानीं स्टेशनावर आलेल्या सर्व बड्या कामदारांच्या व सभ्य गृहस्थांच्या ओळखी नेक नामदार व्हाइसराय साहेबांस करून दिल्या. हा आगत स्वागताचा सर्व प्रकार होत असतां नेक नामदार साहेबांची तब्बियत प्रवासाचे श्रमानें श्रांत झाल्यासारखी दिसत नव्हती, व त्यांची मुखश्री हर्षयुक्त असून वर्तनही फारच सप्रेम होतें. स्टेशनावरील आगत स्वागताचा प्रकार वर लिहिल्याप्रमाणें शेवटास गेल्यानंतर उभय नेक नामदार साहेबांच्या स्वाऱ्या आपल्या स्टापसह तयार असलेल्या चार घोड्यांचे रथांत बसून गणेशखिंडीतील सरकारी बंगल्याकडे रवाना झाल्या. नेक नामदार साहेबांची स्वारी स्टेशनावर आल्याबरोबर व ते सरकारी बंगल्याकडे जात असतां त्यांचे नांवानें वारंवार मोठा जयघोष होत होता, व अशा रीतीनें नेक नामदार साहेबांचे दर्शनसुखानें व आगमनोच्छाहानें सर्व प्रजेस झालेला आनंद प्रदर्शित होत होता. नेक नामदार साहेबांचे आगमनाबरोबर चालीप्रमाणें तोफांची सरबत्तीही झाली, व ते ज्या स्पेशल ट्रेनींतून आले तीही निशाणें, पुष्पगुछ, वेली वगैरेनीं मोठी सुशोभित केली होती.

नेक नामदार व्हाइसराय व गवरनर जनरल साहेबांचे आगमना निमित्त गुरूवारीं रात्रौ गणेशखिंड येथील सरकारी बंगल्यांत बडा खाना झाला, व ह्या महोत्सवाचे प्रसंगीं येथील मोठमोठाले सर्व साहेब लोक हजर होते. दुसरे दिवशीं ह्मणजे शुक्रवारीं सकाळचे १०॥ वाजतां येथील सार्वजनिक सभेचें मानपत्र स्वीकारण्याचा समारंभ झाला. हा समारंभ गणेशखिंड येथील सरकारी बंगल्यांत झाला असून तत्संबंधानें सभेकडील एक डेप्युटेशन मानपत्र घेऊन तेथें गेलें होतें. ह्या डेप्युटेशनांत जे गृहस्थ गेले होते त्यांचीं नांवें येणेप्रमाणें:—

राव बहादूर कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, मि० त्रिंबकराव नारायण राजमाचीकर, मि० विनायकराव रंगराव पुरंधरे, मि० चिंतामणराव विश्वनाथ नातु, मि० मोरेश्वरराव विश्वनाथ नातु, मि० माधवराव यशवंत राखे, राव बहादूर चिंतामणराव हरी देशमुख, वे० शा० सं० रामशास्त्री आपटे, मि० हरी रावजी चिपळुणकर, मि० शिताराम हरी चिपळुणकर, मि० शिवराम हरी साठे, मि० गंगारामभाऊ म्हस्के, मि० दोराबजी दादाभाई बुट्टी, मि० हिंदुमल बाळमुकुंद, मि० हरीदास नानुभाई, मि० बेचरदास अमोलीक, मि० नागेश्वरगीर गुरू कल्याणगीर गोसावी, मि० गोविंद महादेव गद्रे, मि० बाळकृष्ण सायंना, मि० राजन्ना लिंगू, मि० श्रीनिवास शेषो, रा० ब० सदाशिवराव बल्लाळ गौंडे, मि० केशव पांडुरंग गडबोले, मि० कुपुस्वामी विजयरंग मुदलीयार, मि० रामचंद्र गोविंद सापकर, मि० कामजी दोराजी घासवाले, मि० सखाराम रामचंद्र जोशी.

सरकारी बंगल्याचे थोरल्या दिवाणखान्यांत १०॥ वाजल्याबरोबर नेक नामदार व्हाइसराय साहेब व नेक नामदार गवरनर साहेब आपल्या स्टापसह येऊन बसले, व लागलीच डेप्युटेशनचे गृहस्थ आंत बोलावून त्या सर्वांची नेक नामदार साहेबानीं मोठ्या सत्कारानें भेट घेतली, व पुष्कळ गृहस्थांस कांहीं सप्रेम कुशलवृत्ताचे प्रश्न केले. तदनंतर रा० ब० कृष्णाजी लक्ष्मण नूलकर कच्छ संस्थानांतील माजी दिवाण यांणीं सभेनें तयार केलेलें मानपत्र वाचिलें. हें मानपत्र केवळ आगतस्वागताचें असल्यामुळें व नेक नामदार व्हाइसराय साहेबांची स्वारी येथें सरकारी नात्यापेक्षां घरगुती नात्यानें आली असल्यामुळें व सभेकडील एक मानपत्र नेक नामदार साहेबांस नुकेंच कांहीं महिन्यापूर्वी सिमला येथें देण्यांत आलें असल्यामुळें त्यांत राज्यव्यवस्थेच्या संबंधानें विशेष खुलासेवार मजकूर लिहिण्यांत आला नाहीं, तथापि हें मानपत्र दुसऱ्या अनेक कारणामुळें फार महत्वाचें आहे. हें मानपत्र आम्ही आज समग्र रीतीनें इंग्रजींत दिलें आहे, व त्यांतील तात्पर्य व तसेंच नेक नामदार साहेबानीं मानपत्रास दिलेले उत्तराचा सारांश पुढील अंकांत मराठी भाषेंत देण्यांत येईल. रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर ह्यानीं सभेचें मानपत्र वाचण्याच्या पूर्वी उपोद्घातादाखल सभेचे स्थिती बद्दल थोडीशी हकीकत सांगण्यास सुरूवात केली होती व ही हकीकत सांगणें अगदीं शेवटासही आलें होतें, परंतु इतक्यांत त्यांस नेक नामदार गवरनर साहेबानीं खोळंबवून मानपत्राचे बाहेर न जाण्याविषयीं शिफारस केली, व अशा रीतीनें रा० ब० यांचें जें संभाषण अगदीं शेवटावर आलें होतें तें निःकारण अपुर्तें राहिलें. नेक नामदार सर जेम्स फर्ग्युसन यांच्या ह्या वर्तनापासून डेप्युटेशनांतील गृहस्थांचे उल्हासवृत्तींत थोडासा खट्टुपणा उत्पन्न झाला, व अशा उच्छवाच्या प्रसंगीं नेक नामदार साहेबांचें हें वर्तन कांहींअंशीं अप्रासंगिक होतें असें पुष्कळ गृहस्थांस वाटलें. असो, नेक नामदार सर जेम्स फर्ग्युसन यांच्या ह्या वर्तनाबद्दल आजच खुलासेवार लिहिण्याची जरूरी नाहीं. नेक नामदार व्हाइसराय साहेबानीं सभेच्या मानपत्रास दिलेलें उत्तरही जरी फारसें मोठें नाहीं तरी तें फारच महत्वाचें आहे, व तें वाचून नेक नामदार व्हाइसराय साहेबांचे संबंधानें सर्व रयतेची प्रेमबुद्धि आहे ती निःसंशय फार वृद्धिंगत होणार आहे.

वर लिहिल्याप्रमाणें येथील सार्वजनिक सभेचें मानपत्र स्वीकारण्याचा समारंभ झाल्यानंतर नेक नामदार व्हाइसराय साहेबांची स्वारी लागलीच शहरांत यावयास निघाली. स्वारीचा थाट बेताबाताचा असून ती नियमित रस्त्यानें सुमारें ११॥ वाजतां बुधवारचे वाड्याचे बखळी शेजारीं येऊन दाखल झाली. नेक

पुणें, ज्ञानप्रकाश, तारीख ६ डिसेंबर १८८०.

नामदार साहेबांचें आदरातिथ्य करण्याकरितां व त्यांचे संबंधानें आपले मनांतील प्रेमबुद्धि दाखविण्याकरितां रस्त्यानें ठिकठिकाणीं कमानी तयार केल्या होत्या. नेक नामदार व्हाइसराय साहेबांचे स्वारीचा थाट पाहण्यासाठीं व हा मोठा आनंदोत्सवाचा प्रसंग साजरा करण्याकरितां सर्व रस्त्यानें प्रेक्षक जनांची फार मोठी गर्दी झाली होती, व ते नेक नामदार साहेबांचे नांवानें वारंवार जयघोष करीत असत. नेक नामदार साहेबांचें आदरातिथ्य करण्याकरितां बुधवारच्या रस्त्यांत मोठा मंडप घातला असून बुधवारच्या वाड्याचे बखळींतही मंडप तयार केला होता, व हा समारंभ सुशोभित करण्याकरितां दुसऱ्याही कित्येक तजविजी केल्या होत्या. नेक नामदार साहेबांचा सत्कार करण्याचे बुद्धीनें वर लिहिल्याप्रमाणें जी तजवीज करण्यांत आली होती ती अति श्रमानें व जबर खर्चानें झाली होती हें खरें आहे, परंतु ही सर्व व्यवस्था अनेक रीतीनें मोठी दूषणार्ह होती असें लिहिण्यास आम्हांस फार दुःख वाटतें. म्युनिसिपाल कमिटीचे ह्या व्यवस्थेनुरूपच पोलिसाचे बंदोबस्ताचीही स्थिति होती ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. ह्या पोलीस व्यवस्थेनें सकाळचे नऊ वाजल्यापासून तों १।। वाजत तोंपर्यंत रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या गरीब रयतेस पुष्कळ दुःख सोसावें लागलें, परंतु ह्या गोष्टीचे पलीकडे सदर व्यवस्थेपासून एकादा फायदा घडून आला असें आम्हांस वाटत नाहीं. म्युनिसिपाल कमिटीचे उत्सव मंडपांत जशी सर्वच धांदल होती त्याप्रमाणें ह्या पोलीस व्यवस्थेचीही अलेरीस मोठी दुर्दशा झाली, व नेक नामदार व्हाइसराय साहेब मंडपांत असनारूढ झाल्यानंतर त्यानीं कमिटीचे मानपत्रास जें उत्तर दिलें तें फार उंच स्वरांत दिलें असतांही कोणास ऐकूं आलें नाहीं. असो, ह्या पोलीस दुर्व्यवस्थेबद्दल व म्युनिसिपल कमेटीचे वर्तनाबद्दल आज ह्या महोच्छवाचे प्रसंगीं विशेष लिहिणें बरोबर दिसत नाहीं, म्हणोन ह्या संबंधानें येथेंच अधिक मजकूर लिहिण्याची आज जरूरी नाहीं. म्युनिसिपल कमेटीनें दिलेलें मानपत्र केवळ आगतस्वागताचें असल्यामुळें तें फार लहान होतें, परंतु ह्या मानपत्रास नेक नामदार व्हाइसराय साहेबानीं दिलेलें उत्तर जरी फार मोठें नाहीं तरी त्यांत विशेष महत्वाच्या अशा अनेक गोष्टी आहेत. ह्या उत्तरांतील तात्पर्य पुढील अंकांत देण्यांत येईल. नेक नामदार व्हाइसराय साहेबानीं म्युनिसिपल कमेटीचें मानपत्र वर लिहिल्याप्रमाणें स्वीकारल्यानंतर त्यांची स्वारी रेल्वे स्टेशनाकडे रवाना झाली. सदर्हू ठिकाणीं नेक नामदार साहेबांचे बुद्यास योग्य अशी तयारी उत्तम रीतीनें केली होती व सुमारें ५२ वाजल्यानंतर ५० मिनिटांनीं नेक नामदार व्हाइसराय साहेब व नेक नामदार गवरनर साहेब यांच्या स्वाऱ्या स्पेशल ट्रेनीनें मुंबईस रवाना झाल्या.

हत्तक्का

	गुरांचेसुबत्तेच्यादिवसांतीलदर	हल्लींचे दर.
१	उत्तमबैल २५ रुपय	वहल्लींयाचबैलाचीकिंमत२पा·२॥रु·
२	गाय दोन्ही वेळा मिळून ३ तीनशेर दुधदेणारीं	१२रु· वहल्लींयाच गायीचीकिंमत०१०आण्यापासून०१२आण्यापर्यंत.
३	म्हैस दोन्हीवेळा मिळून सहाशेर दुधदेणारीं कि·रु·३०	वहल्लींयाच म्हसीची किंमत२ पासून ३रुपय पर्यंत.
४	वांसरू २ रूपय	वहल्लींचीकिंमत०२पा·०३आ·प·
५	आटलेली गाय ५पा·६	वहल्लींचीकिंमत०५आ·पा·०७आ·प·

हीं सर्वजनावरें विकत घेणारे कोण असा कोणी प्रश्नकेल्यास ह्याणें असें समजावेंकीं तात्काळ मोक्षासजावणारे मृत्यलोकचेंय ममूणजेकसाई.

डत्तक्का

किरकोळसामानाबद्दल.

	मुख्ची किंमत	हल्लींची किंमत
१	कुऱ्हाड ०४पा·०५आणे	तोचडाग २ पैशांस
२	कुदळ ०६ आणे	तोचडाग०१ आण्यास
३	मुसळ ०५आणे	तोचडाग ०१ आण्यास
४	बाज ०८ आणे	तोचडाग०२आण्यास
५	घराचींकवाडें ३पा·४रू·प·	०४पासून ०६ आणे पर्यंत
६	जातें २॥पा·३रु· पर्यंत	$\frac{3}{4}$ रूपयापासून १ रूपया पर्यंत
७	काशाचाभाडा २पा·२॥रु·प·	०५पासून०६ आण्या पर्यंत
८	पितळेचीतपेली ०१०आणे	तोचडाग०२॥ आण्यास
९	तांब्याचा हांडा ७ रूपय	तोचडाग ३ रूपयास

सदरहू सामानदेतकें स्वस्तें जाण्याचेंकारण असें आहे[illegible] असामी आणि घेणारे मारवाडी फक्त २०[illegible] स ह्यांज खेरीज दुसरा कोणास [illegible] नाहीं.

धान्य व वैरण यांचे सुबत्तेच्या दिवसांतील भाव.

१	जोंधळे	एक रुपयास ४८ पासून ५६ शेर पर्यंत.
२	बाजरी	एक रुपयास २४ पासून ३२ शेर पर्यंत
३	गहूं	एक रुपयास २० पासून २४ शेर पर्यंत.
४	हरबरे	एक रुपयास २४ पासून ३२ शेर पर्यंत.
५	करडी	एक रुपयास ५६ पासून ६४ शेर पर्यंत
६	तुप	एक रुपयास २। पासून २॥ शेर पर्यंत
७	कडबा	दर हजारास २॥ रुपयांपासून ३ रुपया पर्यंत
८	सरमाड	दर हजारास १ रुपयापासून १। रुपया पर्यंत

धान्य व वैरण यांचे हल्लींचे भाव.

१	जोंधळे	एक रुपयास १२ पासून १३ शेर पर्यंत +
२	बाजरी	एक रुपयास ९ पासून १० शेर पर्यंत
३	गहूं	एक रुपयास ८॥ पासून ९ शेर पर्यंत
४	हरबरे	एक रुपयास १० पासून ११ शेर पर्यंत
५	करडी	एक रुपयास १५ पासून १६ शेर पर्यंत
६	तुप	दर शेरास १ $\frac{1}{2}$ पासून १ $\frac{1}{4}$ रुपया पर्यंत
७	कडबा	दर हजारास ३० पासून ३५ रुपया पर्यंत
८	सरमाड	दर हजारास २० पासून २५ रुपया पर्यंत

+ सदर हू जोंधळे नवे नसून दोन किंवा तीन वर्षां मागचे पेवांतले आहे त असें समजावें

प्राहे असें म्हणण्याला कांहीं हरकत नाहीं. वरलिहिलेले तारखेपासून आणखी पुढें ज्यावेळीं सभा

भरल्या यांतील गोष्टवार देतो दुसरी सभा ता० २५ मे रोजीं भरली. सांतसभेस वारस

विक अनुमतें ज्यांची असतील त्यांनीं द्यावी व त्या प्रमाणें नाव निशीवार नांवें घे

तलीं. तिसरी ता० १ जून रोजीं भरली त्यांत या सभेस "भुसावळ सार्वजनिक

सभा" हें नांव दिलें. आणि अध्यक्ष उपाध्यक्ष यांची स्थापना झाली. चवथी ता० ६

जुलै रोजीं भरली त्यांत सभेस चिटणीस व खजीनदार यांची योजना, स

भासदांची स्थापना, दरपंधरा दिवशीं सभा भरावी, सभेचें काम शक्तिनुसा

र व निःपक्षपातानें करणें. आणि सभेस निदान पक्ष पंधरा तरी सभा

सद असावेत म्हणजे तीस सभा अशी संख्या योग्य आहे येणें प्रमाणें विष

यांचे विवेचन होऊन अंती ठरलें. पांचवी सभा ता० २० जुलई रोजी भ

रली यांत आमची सभा आपले सभेची शाखा असावी असें आम्ही इच्छितो यास

आपला यास होकार आहे किंवा नाही याचा

आपले सभेंत अगरयाचा निराळा विचार होऊन निकाल आपण कृपा करून कळवावा

अथवा हें पत्र आपले सभेपर्यंत तहकूब राहील असे जरी असलें तरी या प्रमाणें

पत्र पावल्या बद्दल जबाब पाठविण्याची तसदी द्यावी. कळावे लोभ असा

विनंती

ता० भुसावल ता० २५-८-१२

पत्ता

सही.

सभेचे आज्ञेवरून

वामनहरी चितळे, वामन

नारायण कोल्हटकर चि

टणीस व खजीन

रा. रा. [illegible]सुदेव जोशी पुणें सार्वजनिक सभेचे चिटणीस यांस.

वि. तारीख ५ माहे आगस्ट सन १८७३ इ. रवालीं लिहिलेला मजकूर आपणा कडे पाठवि[illegible] आपल्याचा असादरें आपले सभेंत ऊहापोह होऊन उत्तर पाठविण्याची महेरबानी व्हावी. कोणती ही गोष्ट अथवा मजकूर कळावणें तो आरंभा पासून तों शेवट पर्यंत पुरता समजल्या खेरीज त्याचा पूर्ण आशय मनांत भरत नाहीं यास्तव झालेली हकीगत थोडक्यांत सम्यक ज्ञान होई. अशी कळ विती. पत्र विस्ताराची माफी असावी. प्राचीन काळीं वहल्लीं सुद्धां कोणताही समुदायात्मक विचार करणेंत्यास सभा असें म्हणतात. प्रस्तुतच्या काळीं या सभांचातर फार उत्कर्ष झाला आहे व किसेक मोठ्या योग्यतेस चढल्या आहेत. फार काय पण आपलें हल्लींचे राणी साहेबा चें राज्य सुधां पार्लमेंट सभेच्या अनुरोधानें चाललें आहे. सभां पासून होणाऱ्या फायद्यांची मागें फार विस्मृति होती पण आलीकडे ते लोकांच्या नजरस चांगले उघडीत दिसूं लागले आहेत. अहो फार लांब कशास आपल्या देशांतील अति उदयास आलेली पुण्याची सार्वजनिक सभा इणें लोकांच्या मानावर तर उत्कृष्ठ ठसाच केला आहे आणि तिज पासून झालेले व होताहेत ते अनेक लोकोपयोगी फायदे मध्यां रांत येत चालले आहेत असे अनेक विचार येथील भुसावळीच्या लोकांचे मनांत एक वसई कर गृहस्थ यांनी ता. १८ मे राजीं आपण स्वतः खपून घरो घर लोकांस बोलावणी पाठवून चांगलें थोडक्यांत व सुरस असें येथील विठ्ठल मंदिरांत जमलेल्या सभा जनापुढे व्याख्यान दिलें.

व्याख्यानांत राजकीय सत्ता व व्यापार या संबंधानें देश्याचा फायदा व तोटा हे विषय यांनीं चांगले प्रतिपादन केले आणि अज्ञातपणीं सभायाभुसावळसारख्याभर[illegible]स्ती च्यावटोलेजंगगांवांत भसावीअसेंसर्वांसमवाटविलें. हीआमचीसभाईश्वरीछेनें चिरायुहोवो[illegible]णि तिसद्गृहस्थास यश मिळो कारण आमच्या सभारूपी इमारतीचा तो वास्तुस्तंभ

time to refer to the Circulars relating to Dewastans under the head of Alienation in the Revenue Circular Order Book of 1860 or to Section XXII of Act XX of 1858 which Section from its wording as well as from the note made by Mr West just at the foot of the page where the said Section stands in his Code (second Edition) applies to the whole of India, or the Collector would not have made such a statement.

Now as regards the 3rd para.

He tells me that "not being authorized by Govt. to interfere in any way with the management by the Punch or Committee of the Temple Funds, declines to accede to the request made in para 3 of the Secretary's letter under reply." This is true If the Collector had chosen to act up to these orders, he should not have entertained the letter of the Parwatie Committee in which they brought to his notice that they proposed to fill the vacancy caused by the death of a former Member. I had particularly requested him to refrain from so doing or

seens from para 3rd of my letter No 111 of
6th Ultimo a copy of which accompanies
this letter.

I therefore beg that should
you concur with me in what I have stated
above you will be pleased to direct the
Collector to impress on the Parwatee Committee
the necessity of furnishing me with whatever
information I might demand in connection
with the Institution and instruct me
accordingly.

An early reply to this letter will
be most thankfully received

I have the honor &c

D. Ganesh Wapeyodeo
Secretary.

No. 124. Copies of all the former letters
with their replies from the different
authorities were sent to Govt.

This meeting further wishes to place on record its opinion that the insauitary condition of the city of Poona—a city once noted for its salubrity,—is seriously aggravated by the use of canal water for agricultural purposes within the Municipal limits, and in the immediate neighbourhood of the city, and that this evil should be eradicated by the closure of the channels of such irrigation early enough to allow the water in the subsoil to evaporate during the course of the present dry season.

Proposed by Mr. Bal Gangadhar Tilak seconded by Rao Bahadur Wassudeo Bapuji Kanitkar.

III That the Municipality should appoint a Standing Committee to carry out the suggestions now made, and publish for the information of the public quarterly reports of health, setting forth at length such works as may have been executed during that quarter.

बंदेगान आली नबाब लार्ड लिटन् मुस्तताब हजरत आनरेबल् गवर्नर जनरल् साहेब बहादूर दरइजलास कौन्सिल.

अर्जदास्त खालीं सही करणार समस्त रहिवासी राहणार कसबा धारवाड जिल्हा मजकूर इलाखा मुंबई यांची खावंदांच्या चरणापाशीं अति विनयपूर्वक प्रार्थना ऐसीजे,

आमच्या हिंदुस्थानची प्रजा संरक्षण करणारी आमची जननी क्वीन व्हिक्टोरिया महाराणीसाहेब ह्यांनीं "हिंदुस्थानची चक्रवर्तिनी" हा किताब धारण केल्याचा समारंभ दिल्ली शहरीं तारीख १ जानेवारी सन् १८७७ इसवी रोजीं, राणीसाहेबांनीं आह्मा प्रजेच्या संरक्षणार्थ नेमलेले मुख्य आणि योग्य प्रधान अशा खावंदांच्या मारफत. होणार ही वार्ता वर्तमानपत्रद्वारें ऐकून आह्मांस अमितानंद झाला.

आमच्या परम धार्मिक राणीसाहेबांनीं आमच्या व आमच्या वंशजांच्या संगोपनाकरितां खालीं लिहिलेलीं स्तुत्य कार्यें केलीं आहेत. त्यांचे उपकार आह्मी स्मरत आहों, व पुढें चिरकाल स्मरूं.

१ आमच्या ऐहिक सुखसाधनांतील मालमत्तेविषयी विवाद उद्भविला असतां त्यावर निवाडा देण्याकरितां "सिव्हिल् कोर्टें" स्थापिलीं आहेत.

२ कोणी दुष्ट मनाच्या मनुष्यांनीं आह्मांस उपद्रव केला असतां त्यांस योग्य शासन करण्याकरितां "माजिस्त्रेट कोर्टें, सेशन कोर्टें व हाय कोर्टें" स्थापिलीं आहेत.

३ आह्मांस चोरांचा उपद्रव व इतर कोणत्याही प्रकारची पीडा न व्हावी ह्मणून रात्रंदिवस पाहारा करण्याकरितां "पोलीस खातें" ठेविलें आहे.

४ परराष्ट्रसंबंधी शत्रूचा उपद्रव न व्हावा ह्मणून दर एक जिल्ह्याच्या मुख्यठिकाणीं लष्कर ठेवून बंदोबस्त केला आहे.

५ आमच्या प्रवासाच्या व व्यापाराच्या सोई करितां मोठमोठे रस्ते इंजिनियर लोकांकडून करविले आहेत.

६ प्रवाशांच्या श्रम परिहारार्थ मार्गात जागोजाग तळीं व विहिरी खोदविल्या आहेत, धर्मशाळा बांधविल्या आहेत, आणि झाडें लाविलीं आहेत.

७ दुखण्यानें इजा भोगणाऱ्या लोकांस फुकट औषध देण्याकरितां "दवाखाने" ठेविले आहेत.

८ आमच्या मुलांनीं ज्ञानसंपादन करून उत्तम स्थितींत रा

हावें ह्मणून "शाळा खातें" स्थापन करून आह्मांस एक मोठें सुखाचें साधन करून ठेविलें आहे.

९ सालमजकुरीं परमेश्वराची आह्मांवर गैर मर्जी होऊन, अवर्षणामुळें लोकांस मोठी विपत्ति प्राप्त झाली आहे असें पाहून, अन्नावांचून मरणाऱ्या लोकांच्या बचावाकरितां खजीन्यांतून पैसा देण्याचे हुकूम सरकारानीं फर्माविले आहेत. तेणेंकरून राणीसरकारच्या कृपाळुपणाविषयीं आमच्या मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न होईल अशा रीतीनें सांप्रतच्या संकट समयीं आमचें संरक्षण होत आहे.

१० वर लिहिलेलीं हर एक कामें चालविण्याकरितां विश्वासू आणि योग्य असे अधिकारी नेमून ठेविले आहेत. तेणेंकरून आह्मी मोठ्या सुखानें राहात आहों.

११ आमच्या प्राचीन ग्रंथांत धार्मिकपणानें प्रजापालनाविषयीं रामराज्याची ज्या प्रमाणें प्रशंसा केली आहे, त्याच प्रमाणें महाराणी साहेबांकडून व त्यांनीं नेमलेल्या प्रधान मंडळांकडून आमचें प्रतिपालन होत आहे.

१२ प्रजासंरक्षणाच्या कामाकरितां राणी सरकार ज्या लोकांस नौकरीस ठेवितें, ते लोक नौकरी करीत आहेत तोंपर्यंत तर त्यांस मोठ मोठे पगार मिळतच आहेत; त्या शिवाय त्यांस आमरणांत "पेनशन्" ही मिळतें. हें मोठ्या पुण्याचें कृत्य आहे.

१२ पूर्वीच्या लोकांनीं धर्मकृत्यांच्या उद्देशानें दिलेलीं बहुतेक इनामें आणि वर्षाशनें राणी सरकार आज पर्यंत चालवीत आहे. त्या योगानें फार कुटुंबांचें संरक्षण होतें.

हे व आणखी कितीएक महदुपकार राणी साहेबांनीं आह्मावर केले असून, त्या चक्रवर्तिनी हा किताब धारण करितात असें वर्तमान ऐकून आह्मांस अतिशय आनंद झाला आहे. आणखी पुष्कळ परराज्यें राणी सरकारचे हस्तगत होवोत, आणि त्यांचे हातून परचक्रांचा नाश वारंवार होवो, अशी परमेश्वराला आमची फार फार प्रार्थना आहे.

आतां खावंदांला आमची विनंती इतकीच आहे कीं, हाल्लींचे महोत्सवाचे प्रसगीं खालीं लिहिलेली देनगी खावंदानीं मेहबान होऊन आह्मा हिंदु प्रजेस द्यावी.

या आमचे हिंदुस्थान देशांतील सर्व लोक हिंदू धर्माचे असून आमचें परदैवत गायत्री आहे. ती गायत्री गाईच्या रूपानें आमचे देशांत वास करीत आहे असें आह्मी समजतों. त्या आमचे परदैवत गायत्रीचा वध आह्मांसमक्ष या देशांत निरंतर लोक करितात, हें बंद व्हावें इतकीच आमची प्रार्थना आहे. असें झालें असतां आह्मां

श्री.

श्रीमंत महाराज तुकोजीराव बाबासाहेब गोब्राह्मण प्रतिपाळक होळकर सरकार इलाखा इंदूर, महाराजांचे शेवेशी.

अज्ञा धारक गोपाळ नरसिंहराव देशपांडे इदापूरकर रयतेचा एजन्ट मुक्त्यार इंदापूर, भिमथडी, पुरंदर, खेड, जुन्नर, शिरूर, करमाळे तालुक्यांनिहाय जिल्हा पुणें, सोलापूर, रामराम विनंती विज्ञापना तागाईत कार्तीक वद्य १३ त्रयोदशी शके १७९८ धात्रृनाम संवत्सरे पावेतो धुरंधर श्रीमंत महाराजांचे पूर्ण कृपेकरून उत्तम असो विशेष. महाराज आपले भरतखण्डापैकीं दक्षिण प्रांतात सोलापूर, कलादगी, बेळगांव हे तिन्ही सबंद जिल्हे व नगर जिल्ह्यापैकीं सात तालुके; पुणें जिल्ह्यापैकीं भिमथडी, इंदापूर हे दोन तालुके पूर्व भागचे या सर्व ठिकाणीं मोठा दुर्घट दुष्काळ पडून लक्षानुलक्ष मनुष्यें व जनावरें अन्नान्न, चारा चारा, करून मरणोन्मुख झालें; हजारोंचे हजारों बैल, गायीं वगैरें जनावरें मेलीं गेलीं; बाकीं राहिलेलीं जनावरें घेऊन दयाळू दौलत मदार निजाम बहादूर सरकारचे राज्यांत जिवाचे रक्षणार्थ स्वदेशबंधु निघून गेले; तो प्रकार खालील कलमीं प्रदर्शित केल्यावरून स्वदेश हितेच्छु महाराजांचे लक्षांत येऊन गोब्राह्मण व अनाथ ज्ञातीबंधुंचे कल्याणाविषयीं लक्ष पुरवावें ह्मणून मोठ्या नम्रतेनें हात जोडून विनयपूर्वक प्रार्थना आहे.

१ माझें नांवें सात तालुक्यांतील रयतेकडून कुल मुक्त्यारनामे मिळाल्यावरून स्वदेश हिताकरितां वारंवार नामदार सरकारास सूचनेचे अर्ज करितों; त्याप्रमाणें दुष्काळपीडित लोकांच्या बचावाकरितां सरकारास अर्ज केल्यावरून सरकारांनीं नवीन रस्ते व जुनें तलाव खोदण्याचें काम सरासरीचें मानानें सुरूं केलें; त्यावर सामान्य पक्षांचे अनाथ रयत लोक एक तृतिअंश लागून बचावांत आहेत. बाकी दोन तृतिअंश जें ब्राह्मण व इतर ज्ञाती ह्मातारे अबुदार व स्त्रिया आणि लहान लहान

बालकांस कोठें अधार नाहीं, त्यांचे हातून सदर कामावर जाऊन व मेहेनत करून निर्वाह करवेल असें नाहीं; ह्मणून आठ आठ दिवस उदकपान करून राहिले; असें संकट स्वदेशबंधुंवर आलें आहे.

२ सदर्हू प्रकारचें धुरंधर संकट इंदापूर येथील ऐक्यवर्धनी-य न्याय सभेंतील अध्यक्ष रा० रा० कृष्णराव नागेश नाडगौंड, उपाध्यक्ष माधवराव वामन देशपांडे इनामी जहागीरदार, खजीनदार बळवंतराव गोपाळ जावडेकर, चिटणीस रामचंद्र नरसिंहराव देशपांडे, सभासद वे. सं. रा. सखाराम आकंभटमुळे या पंचांनीं गांवांतील ऐपतदार मंडळीस सभेंत बलाऊन त्यांस सुमार्गाचीं व्याख्यानें देऊन दररोज कैली मापें ८ पायली ज्वारी-प्रमाणें ९ नऊ महिनेंपर्यंत गुजारा करण्याचा विचार सुरू करून २५ दिवस झाले. आठ पायलीं ज्वारीच्या भाकरी करून दोन पायलीच्या ब्राह्मण मंडळींकडे, बाकी सहा पायलींच्या इतर ज्ञातींकडे देत आहेत. सदर्हू धान्यांत १२५ मनुष्यांचा गुजारा एक वेळेचा होत आहे. बाकी शेंकडों ब्राह्मण व हजारों इतर ज्ञातीबंधू अन्नावांचून उपास काढीत आहेत.

३ कित्येक मराठे उत्तम ज्ञातीचे स्त्री पुरुष अमोल्य पोटची मुलें रात्रौ निद्रस्त करून पहांटेस मुलांची आशा सोडून जागचे जागीं मुलें सोडून जातात अशी स्थिती स्वदेश बंधू जनांस प्राप्त झाली; अशा ईश्वरी क्षोभांत तारणारे श्रीमंत महाराज कल्पवृक्षा सारखे समर्थ आहेत. ह्मणून इंदापूर तालुक्यातील एकंदर रयतेनीं मजला आज्ञा केली कीं, आपले स्वदेशबंधू रत्नाचें खांब शिंदे, होळकर महाराज आहेत त्यांस प्रार्थनापत्रें लिहून संकटसमयीं मदत अणावी; ते रणांतील उदकाची चूळ दिल्यावांचून रहाणार नाहींत. वेळोवेळीं संकटसमयीं गोब्राह्मणांचे खरे प्रतिपाळक आहेत. पूर्वी अविंधी राज्यांत गोब्राणांवर स्वधर्मसंबंधीं महत संकट आलें होतें त्यावेळेस प्रतापसिंह बाजीराव बल्लाळ पेशवे यांस मल्हारराव महाराज होळकर व त्यांचे पुत्रपौत्रांनीं कंबरा बांधून खांद्यांवर भाले धारण करून कित्येक वर्षें महत श्रम व दुःख भोगून कित्येक रणशूर पुरुष रणी धन्यही झाले आणि भरतखंडवाशी स्वदेशबंधूंचा स्वधर्म रक्षिला. तो उपकार आह्मीं बंधू आठवून चिरकाल दुवा देत आहोंत. महाराजांचे पूर्वज सुमर्द पुरुषांनीं कर्तव्य बजाविलें तेव्हढेंच नाहीं; होळकर घराण्यांतील स्त्रियांनींही भरतखण्डवासी जनांवर उपकार करून सुकीर्तिस पात्र झाल्या. मातोश्री अहिल्याबाई या मातेनें ठिकठिकाणचें तिर्थाचें ठिकाणीं मोठमोठीं विस्तीर्ण मंदिरें बांधि-

लीं, अन्नछत्रें ठेविलीं, रस्तोरस्ती उदकाकरितां विहिरी तयार करून ठेविल्या; तो विस्तार इतिहासांतून व प्रत्यक्ष पाहून आनंद मानीत आहोंत कीं, खऱ्या विरकऱ्या आमच्या देशांत झाल्या.


४ भरतखंडांत पुष्कळ ठिकाणीं इतर लोक आपले स्वधर्म विरहित आहेत; त्यांस संकटसमयीं मदत मागितली नाहीं कारण गंगोदकाचा आश्रय केल्यापासून जसा देह पुनीत होतो तसा इतरांपासून होऊ सकत नाहीं. संकटसमयीं महाराजांशिवाय दाता कोण आहे? नाहीं ह्मणून श्रीमंतांचे शेवेशी हें विनंतीपत्र लिहिलें आहे; तर महाराजांकडून अच्यलासारखें खजिन्याकडे अज्ञा होऊन गोब्राह्मण व देशबंधूंचे जीव बचावण्या साठीं १०००० दहा हजार रुपये पुणें जिल्ह्यातील तालुके इंदापूर येथील पंच दुसरें कलमांत लिहिलें आहेत यांजकडे पाठवावे ह्मणजे त्यांची व्यवस्था दुष्काळपीडित बंधूंकडे करून खर्चाचे हिशेबही श्रीमंतांकडे रवाना होतील. अनरेबल रा० सा० विश्वनाथ नारायण मंडलीक हायकोर्ट मुंबईचे वकील यांणीही यथाशक्ती मदतकरण्यासाठीं दोन हजार रुपये इंदापुरचे पंचांकडे पाठविण्याची तजवीज केली आहे.

५ महाराज सरकारची स्वारी दिल्ली दरबारास जाणार त्यावेळेस लक्षानुलक्ष रुपये खर्च उडाला जाणार आहे; त्यांपैकीं दहा वीस हजार रुपये खर्च कमी होऊन दुष्काळपीडित अनाथ बंधूंचे उपयोगास दिल्यापासून भरतखंडवाशी थोर सुजनांस आनंद वाटून स्वदेश प्रीति खरी राखिल्याचा बाणा दिसून येणार आहे. जळांत, अग्नींत पडून मरणोन्मुख झाल्यास त्यांस धावून काढणें, दुष्काळपीडित होऊन अन्नान्न करून मरणारे प्राण्यांस अन्न देऊन जीव बचावणें हें महत् पुण्य आहे. महाराजांचे पूर्वजांचे वेळेस स्वधर्म संबंधीं महत् संकट असें तद्वत् सांप्रत नसून दुष्काळरूपीं राक्षसाचे मुखातून सोडविणार श्रीमंत महाराज समर्थ आहेत.

एकूण पांच कलमीं विनंतीपत्रांतील उद्देश महाराजांचे अवलोकनांत येऊन अनाथ गोब्राह्मणांस व ज्ञातीबंधूंस मदत केल्यापासून आमचेवर उपकार होतील व सांप्रत सरकारासही आनंद वाटणार आहे. महाराजांनीं पूर्वजांचे ब्रिद राखिल्याप्रमाणें होऊन बहुत दिवस या जगांत सुकीर्ती रहाणार आहे. कळावें शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पुणें येथें "विठ्ठल सखाराम अग्निहोत्री" यांचे छा० छा०.




COURT FEES
BOMBAY
EIGHT ANNAS